


दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोणा (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २४५ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.१२ जुलै २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## जनसुरक्षा विधेयक आंदोलनाचा अधिकार काढून घेत नाही

# केवळ नक्षल, माओवादाशी संबंधित संघटनावर कारवाई होईल-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई (वृत्तसंस्था)-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा बहुचर्चित महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकाद्वारे केवळ नक्षलवादी व माओवादी चळवळीशी संघटनांवर कारवाई होणार असल्याचे स्पष्ट केले. प्रस्तुत विधेयक कोणत्याही लोकशाही प्रक्रियेच्या विरोधात नाही. ते कुणाचा आंदोलनाचा अधिकारही काढून घेत नाही. हे विधेयक केवळ नक्षलवादी व माओवादी चळवळीशी संबंधित फ्रंटल संघटनांवर बंदी घालण्यासाठी आणण्यात आले आहे, असे ते म्हणाले.महाराष्ट्र विधानसभेने गुरूवारी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकावर आपली मोहोर उमटवली. हे विधेयक आवाजी मतदानाने पारित करण्यात आले. आज विधिमंडळ परिसरात पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक मंजूर झाल्यावर समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, मला अतिशय आनंद आहे की, जनसुरक्षा विधेयक काल विधानसभेने मंजूर केले. कालच्या चर्चेत या विधेयकासंदर्भात ज्या काही शंका होत्या, त्या सर्व शंकांचे उत्तर मी दिले आहे. हे विधेयक पारित करताना आम्ही अतिशय लोकशाही पद्धत आम्ही स्वीकारली. २६ लोकांची संयुक्त निवड समिती होती. त्यात विरोधी पक्षांचे सर्वच प्रमुख नेते होते. या समितीने लागोपाठ बैठका घेतल्या. या प्रकरणी ज्या काही सुधारणा आल्या होत्या, त्या समाविष्ट करण्यात आल्या.

### महाराष्ट्रात एकूण ६४ संशयास्पद संघटना

सद्यस्थितीत महाराष्ट्रात दुसऱ्या राज्यांत बंदी असलेल्या, पण येथे कार्यरत असणाऱ्या ६ संघटना आहेत. याशिवाय अशा पद्धतीच्या एकूण ६४ संघटना महाराष्ट्रात अस्तित्वात आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### संजय गायकवाडांवर गुन्हा दाखल होणार?

मुख्यमंत्र्यांनी यावेळी कॅन्टीन कर्मचाऱ्याला केलेल्या मारहाणीविषयी शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा नोंद न झाल्यावरही आपले मत व्यक्त केले. निश्चितपणे पोलिसांनी चौकशी केली पाहिजे. या प्रकरणी एखादी तक्रार दाखल होण्याची गरज नाही. या प्रकरणी दखलपात्र गुन्हा असेल तर त्यासंदर्भात पोलिस योग्य ती कारवाई करतील. शेवटी फोर्स किती यूज केला या आधारावर कारवाई होते. पोलिसांना कारवाई करू द्या ते योग्य ती कारवाई करतील, असे ते म्हणाले.



यासंदर्भात विशेषतः काँग्रेस प्रणित यूपीएच्या सरकारने राज्यसभेत दिलेली माहिती मी वाचून दाखवली. यूपीएच्याच सरकारने यासंदर्भात सुप्रीम कोर्टात सादर केलेले प्रतिज्ञापत्रही मी वाचून दाखवले. त्यामुळे कुठल्याही राजकीय भावनेने प्रेरित न होता या महाराष्ट्राला भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधान दिले आहे. त्या संविधानानेच हे राज्य चालेल. हे संविधान उलथावण्याचा प्रयत्न करणाऱ्या संघटनांवर कारवाई करण्यासाठी हे विधेयक तयार करण्यात आले आहे. मला आनंद आहे की कोणत्याही सदस्याने या विधेयकाला थेटपणे विरोध केला नाही, असे फडणवीस म्हणाले.

### माओवादी संघटनांवर बंदी घालण्यासाठी विधेयक

१२ हजार वेगवेगळ्या लोकांनी या विधेयकावर काही सूचना शिफारशी केल्या होत्या. त्या समाविष्ट करण्यात आल्या. त्यानंतर संयुक्त निवड समितीने आपला अहवाल सादर केला. त्यावर आधारित विधेयक काल आपण सभागृहात मांडले होते. या बिलाच्या चर्चेत मी स्पष्टपणे दाखवून दिले की, हे विधेयक कुठल्याही लोकशाही प्रक्रियेच्या विरोधात नाहीत. कुणाचाही आंदोलनाचा अधिकार काढून घेत नाही. कोणत्याही लोकशाही मानणाऱ्या संस्थेवर किंवा संघटनेवर कुठलाही घाला घालणारे हे विधेयक नाही. हे विधेयक नक्षलवादी व माओवादी चळवळीशी संबंधित ज्या फ्रंटल संघटना आहेत, त्या संघटनांवर बंदी घालण्यासाठी हे विधेयक आणण्यात आले आहे.

### महाराष्ट्र फ्रंटल संघटनांचे आश्रयस्थान

फडणवीस पुढे म्हणाले, मी सभागृहाच्या लक्षात आणून दिले की, ४ राज्यांनी यापूर्वीच अशा प्रकारचे विधेयक यापूर्वीच मंजूर केले आहे. केंद्राने सर्वच नक्षलग्रस्त राज्यांना अशा प्रकारचे विधेयक मंजूर करण्याचे निर्देश दिलेत. मी हे ही सांगितले की, आपल्याकडे कायदा नसल्यामुळे दुसऱ्या राज्यात बंदी असलेल्या संघटना राजरोसपणे आपल्या महाराष्ट्रात आपल्या कारवाया करतात. कारण, आपल्याकडे त्यांच्यावर कारवाई करण्याचा कोणताही अधिकार नाही. मी हे देखील लक्षात आणून दिले की, कशा प्रकारे माओवादी संघटनांनी आपले ऑपरेशन अर्बनमध्ये केले आहे. फ्रंटल संघटना तिथे काम करत आहेत.

## दारूबंदीच्या लढ्याने पेटले नाडसे गाव!

# महिलांचा आक्रोश,पोलिसांच्या भूमिकेवर थेट सवाल;'सह्याद्रीचा राखणदार' बनतो आवाज

**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील नाडसे गावात गावठी आणि देशी दारूच्या अवैध विक्रीमुळे जनतेचा संयमाचा बांध अखेर तुटला आणि गावकरी रस्त्यावर उतरले. अनेक घरांची वाताहत करणाऱ्या या अवैध दारूबाजाराला कायमचा आळा बसावा, यासाठी गावातील महिलांनी पोलिस प्रशासनाच्या निष्क्रीयतेविरोधात ठाम भूमिका घेत संताप व्यक्त केला.



गावातील परिस्थिती इतकी बिघडली आहे की, अनेक घरांत दारूचे पैसे, हिंसाचार आणि मानसिक तणावाचे वावटळ उसळले आहे. याच अन्यायाला वाचा फोडण्यासाठी गावकरी आणि विशेषतः महिलांनी साक्री पोलीस ठाण्यात धडक दिली. पोलीस निरीक्षक दीपक वळवी यांना निवेदन सादर करत महिलांनी भावनिक आणि ठाम शब्दांत आपला आक्रोश मांडला. अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांतूनही त्यांची मागणी स्पष्ट होती दारू बंद झालीच पाहिजे!

महिलांनी पोलिसांवर थेट आरोप करत म्हटले की, गावात पोलिसांच्या डोळ्यांदेखत सर्रास दारू विक्री सुरू आहे. मग एवढा अंधार कुठून येतो? हे तुम्हीच सांगा! या कठोर शब्दांनी पोलिसांची कार्यशैली आणि जबाबदारीवर थेट सवाल उपस्थित करण्यात आला.

याचबरोबर काही गावकऱ्यांनी पोलिसांवर लाचखोरीचे गंभीर आरोप करत म्हटले की, दारू विक्रेत्यांकडून लाच घेऊन पोलीस त्यांना अभय देतात. म्हणूनच कारवाई होत नाही, आणि गावात दारूच्या बाटल्यांचा खच वाढतच आहे. कायदा केवळ कागदावर आहे का? अशा शब्दांत त्यांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेवर रोष व्यक्त केला.या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दैनिक सह्याद्रीचा राखणदार ने गावाच्या आवाजाला बुलंद करत महिलांच्या आक्रोशाला व्यासपीठ दिले. या सामाजिक लढ्याचे सत्य व पारदर्शक वार्तांकन केल्याबद्दल गावकऱ्यांनी दैनिकाचे मनापासून कौतुक केले. आमच्या वेदनांना आवाज दिला, आमच्या लढ्याला दिशा दिली,अशा भावना अनेक महिलांनी व्यक्त केल्या.

नाडसे गावातील दारूबंदीची ही चळवळ आता केवळ एका गावापुरती मर्यादित राहिलेली नाही. तिचा प्रतिध्वनी संपूर्ण साक्री तालुक्यात उमटत असून, ही लढाई आणखी तीव्र होणार याचे संकेत मिळू लागले आहेत. आता प्रशासन जागे होईल का, की अजूनही झोपेचं सोंग घेत राहील? हा खरा प्रश्न आहे!

## शिकायचंय, पण कोण शिकवणार? शिक्षका विना भिजत चाललेलं आदिवासी मुलींचं स्वप्न

**पालघर । नितीन बोंबाडे**

पालघर जिल्ह्यातील कन्या वरवाडा व रणकोळ येथील आश्रमशाळांमध्ये सध्या विद्यार्थिनींच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. इयत्ता १२वी सायन्स शाखेतील वर्ग चालू असूनही अद्याप शिक्षकांची नियुक्ती न झाल्याने विद्यार्थिनींच्या मनात अस्वस्थता आणि नाराजी निर्माण झाली आहे. शिक्षणासाठी आवश्यक ती सोय असतानाही शिक्षकच नसल्याने शिकायचंय... पण कोण शिकवणार? असा भावनिक प्रश्न या विद्यार्थिनींकडून उपस्थित केला जात आहे.

शाळा सुरू होऊन महिना उलटला असतानाही विज्ञान विषयांमध्ये शिक्षक उपलब्ध नाहीत. विशेषतः भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र यांसारख्या विषयांची वर्गशिक्षक पदे रिक्त आहेत. त्यामुळे बोर्ड परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थिनींचं शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता अधिक आहे.मुख्याध्यापकांनी यासंदर्भात वरिष्ठ कार्यालयांकडे वेळोवेळी निवेदन दिले असूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. परिणामी, विद्यार्थिनींच्या शिक्षणात खंड पडत असून त्यांचा आत्मविश्वास डळमळीत होत आहे.

विज्ञान शाखेत शिकण्याची उमेद घेऊन या शाळेत दाखल झालो, पण अभ्यासक्रम सुरू होत नाही. बोर्ड परीक्षेचं टेन्शन वाढतंय आणि शिकवायला कोणीच नाही,असे मनोगत एका विद्यार्थिनीने व्यक्त केले.

या परिस्थितीमुळे विद्यार्थिनींसह पालक आणि ग्रामस्थांमध्येही तीव्र असंतोष आहे. १२वी हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील निर्णायक वर्ष आहे. जर वेळेत शिक्षक मिळाले नाहीत, तर विद्यार्थ्यांचं भविष्य अंधारात जाणार,अशी प्रतिक्रिया पालकांनी दिली आहे.शासनाने शिक्षण हक्क कायद्यांतर्गत शिक्षणाची हमी दिलेली असतानाही प्रत्यक्षात मुलींना शिक्षकच मिळत नसल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे शिक्षकांच्या रिक्त पदांबाबतची दिरंगाई प्रशासनाच्या निष्काळजीपणाचं प्रतीक आहे, असा आरोप स्थानिकांनी केला आहे.या पार्श्वभूमीवर कन्या वरवाडा आणि रणकोळ आश्रमशाळांमध्ये विज्ञान शाखेसाठी आवश्यक शिक्षकांची नियुक्ती तातडीने करण्यात यावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. अन्यथा, हा प्रकार विद्यार्थिनींच्या शिक्षणहक्काचा गंभीर भंग ठरेल, अशी टीका शिक्षणप्रेमींकडून करण्यात येत आहे.

## गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसासह युवक अटकेत; वैजापूर पोलिसांची कारवाई

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर शहरात गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे अवैधरित्या बाळगणाऱ्या एका युवकाला वैजापूर पोलिसांनी अटक केली असून, त्याच्याविरुद्ध भारतीय हत्यार अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.९ जुलै २०२५ रोजी वैजापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सत्यजीत ताईतवाले यांना गोपनीय माहिती मिळाली की, वैजापूर-कोपरगाव मार्गावरील शेतकरी हॉटेलजवळ एक इसम संशयास्पद हालचाली करत असून, त्याच्या कमरेला गावठी कट्टा आहे. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक ताईतवाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तत्काळ कारवाई करत हॉटेल परिसरात सापळा रचला.



संशयित इसम हॉटेलबाहेर येताच पोलिसांनी त्याला शिताफीने ताब्यात घेतले. चौकशीत त्याचे नाव शुभम अनिल बाहेती (वय २७, रा. मुळेगल्ली, वैजापूर) असे असल्याचे निष्पन्न झाले. अंगझडतीदरम्यान त्याच्याकडे एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे आढळून आली. सदर शस्त्रे त्याने परवाना न घेता बाळगली असल्याने ती तात्काळ जप्त करण्यात आली.

या प्रकरणी शुभम बाहेती याच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ३ व २७ अन्वये वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सत्यजीत ताईतवाले, पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे, पोलीस अंमलदार किरण गोरे, योगेश झाल्टे, कुलदीप नरवडे, अविनाश भास्कर, प्रशांत गिते, अजित नाचन आणि त्यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

## शेगाव पोलीस ठाणे हद्दीत अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार; तिघे आरोपी अटकेत,'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल

### विडिओ क्लिप व्हायरल झाल्याने घटना उघड; जिल्हा पोलिसांकडून तात्काळ कारवाई

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत माणुसकीला काळिमा फासणारी अत्यंत धक्कादायक घटना समोर आली असून एका अल्पवयीन मुलीवर तिघा नराधमांनी सामूहिक अत्याचार केल्याची माहिती उघड झाली आहे. अत्याचाराचा विडिओ बनवून तो सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आल्याने या गंभीर घटनेची वाचा फुटली.



११ जुलै रोजी दुपारी सुमारास पीडित मुलगी आपल्या वडिलांसह शेगाव पोलीस ठाण्यात दाखल झाली आणि तिने दिलेल्या तक्रारीवरून पोलीसांनी तपास सुरू केला. पीडितेच्या म्हणण्यानुसार, ही घटना २४ मे रोजी घडली होती. त्या दिवशी तिला आरोपींनी फसवून एका ठिकाणी नेले आणि तिच्यावर आळीपाळीने अत्याचार केला. त्यानंतर या घटनेचा विडिओ बनवून तो सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आला.शेगाव पोलीसांनी तातडीने कारवाई करत आरोपींची ओळख पटवली व त्यांना अटक केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये स्वप्नील राजकुमार गुर्जनवार व गणेश राजेंद्र विश्रामकर (दोघेही रा. पवनगाव, ता. समुद्रपूर, जि. वर्धा) आणि रोहन गजानन विश्रामकर (रा. चंद्रपूर) यांचा समावेश आहे.या तिन्ही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ७०(२), १२३ तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोक्सो) अंतर्गत कलम ४ व ६ आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील कलम ६६(ई), ६७(अ) अंतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.घटनेची संवेदनशीलता लक्षात घेता चंद्रपूर जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली भद्रावती, वरोरा, चिमूर, भिसी येथील पोलीस अधिकाऱ्यांसह दंगा नियंत्रण पथकाला शेगाव येथे तातडीने पाठविण्यात आले. घटनास्थळी फॉरेन्सिक पथकाने भेट देऊन आवश्यक तपासणी केली. अशा प्रकारच्या घटनांमुळे गावात तणाव निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेतली.दरम्यान, पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे की या घटनेशी संबंधित कोणताही विडिओ अथवा फोटो कोणीही सोशल मीडियावर प्रसारित करू नये. अन्यथा संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा उपविभागीय पोलीस अधिकारी राकेश जाधव (चिमूर) यांनी दिला आहे.या अत्यंत निंदनीय घटनेचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी राकेश जाधव हे चंद्रपूर जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत.

# चारोटी येथे माकपाचा राष्ट्रीय महामार्ग रोको आंदोलन केंद्र–राज्य सरकारच्या धोरणांचा तीव्र निषेध

**पालघर । नितीन बोंबाडे**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (माकपा) व सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स यांच्या ठाणे–पालघर जिल्हा समितीच्या वतीने ९ जुलै रोजी चारोटी येथे मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. केंद्र व राज्य सरकारच्या कामगारविरोधी आणि खासगीकरणास पोषक धोरणांच्या निषेधार्थ करण्यात आलेल्या या आंदोलनामुळे दोन्ही बाजूंनी वाहतूक पूर्णतः ठप्प झाली होती. परिणामी महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले.



या आंदोलनात कामगार, योजना कर्मचारी, अंगणवाडी सेविका, हमाल, शेतकरी, मच्छीमार, बांधकाम कामगार, स्थलांतरित मजूर अशा विविध घटकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. आंदोलनस्थळी झालेल्या भाषणांमध्ये केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका करण्यात आली. माकपाचे आमदार कॉ. विनोद निकोले यांनी उपस्थितांना संबोधित करताना म्हटले की, नवीन श्रम संहितांमुळे कामगारांचे मूलभूत हक्क धोक्यात आले आहेत. हे जुलमी धोरण आम्ही कदापिही स्वीकारणार नाही. अधिवेशन सुरु असून आम्ही या सर्व मागण्या सरकार दरबारी ठासून मांडणार आहोत.

कामगार विरोधी चारही श्रम संहिता तात्काळ रद्द कराव्यात, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (ईपीएफ) संदर्भातील लोकशाहीविरोधी बदल मागे घ्यावेत, मातांना २६ आठवड्यांची पगारी रजा लागू करावी, सर्व किमान वेतन २१ हजार रुपये मासिक करावे, अंगणवाडी सेवा वर्षभर सुरु ठेवावी, कंत्राटी व तात्पुरत्या भरती प्रक्रिया थांबवाव्यात, कामगारांना नियमित दर्जा द्यावा, महागाई भत्ता योग्य हिशोबाने लागू करावा, महागाईवर नियंत्रणासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, शेतकऱ्यांना हमी दर द्यावा, आणि योजना कर्मचाऱ्यांना शासकीय मान्यता व न्याय्य वेतन द्यावे अशा मागण्या आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत मांडल्या.

बांधकाम, घरकाम, मच्छीमारी, कृषी व स्थलांतरित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षेच्या उपाययोजना तात्काळ राबवाव्यात, तसेच सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण थांबवावे, अशा मागण्याही आंदोलनात ठळकपणे समोर आल्या. या आंदोलनात महिलांचा सहभाग लक्षणीय होता. अनेक अंगणवाडी सेविका व कामगार महिलांनीही रस्त्यावर उतरून सरकारच्या धोरणांचा निषेध केला.चारोटी येथील रस्ता रोको आंदोलन हे केंद्र व राज्य शासनाला दिलेला स्पष्ट इशारा होता आता कामगारांचे हक्क आणि सामाजिक सुरक्षेच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन अधिक तीव्र होईल, अशी एकसंध भावना आंदोलनकर्त्यांमध्ये दिसून आली.

# जातेगाव खुर्द व तळेगाव ढमढेरे शाळांना नव्या वर्गखोल्यांची व ग्रंथालयाची भेट

## फोसेको इंडिया लिमिटेडचा शैक्षणिक सुविधांसाठी उल्लेखनीय सीएसआर उपक्रम

**शिरूर । रमेश बनसोडे**

शिरूर तालुक्यातील ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस चालना देण्यासाठी फोसेको इंडिया लिमिटेड या कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या उपक्रमाअंतर्गत जातेगाव खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला व तळेगाव ढमढेरे येथील आनंद आश्रम माध्यमिक शाळेला नवीन वर्गखोल्या आणि ग्रंथालयाचे वाटप करण्यात आले.या नव्या शैक्षणिक पायाभूत सुविधांमुळे सुमारे ५०० विद्यार्थ्यांना आधुनिक व सुयोग्य शिक्षण वातावरण प्राप्त झाले असून, भविष्यातील गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी याचा उपयोग होणार आहे. वर्गखोल्यांमध्ये आरामदायी आसनव्यवस्था, प्रकाशमान खिडक्या, डिजिटल शिक्षण साधने आणि वाचनालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



उद्घाटन समारंभ प्रसंगी फोसेको कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद चावरे, शाळांचे मुख्याध्यापक, ग्रामस्थ, रोटरी फाउंडेशनचे प्रतिनिधी आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रसाद चावरे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, या वर्गखोल्या म्हणजे केवळ भिंती नाहीत, तर त्या विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देणारी आशेची प्रतीके आहेत.शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडतो, हे लक्षात घेता फोसेको इंडिया लिमिटेडने ग्रामीण भागातील शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण पोचवण्यासाठी हे योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध व्हावी आणि शिक्षणात गुणवत्ता यावी, हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.या उपक्रमासाठी आवश्यक निधी सीएसआर फंडातून उपलब्ध करून देण्यात आला असून, रोटरी क्लब व स्थानिक ग्रामस्थांनीही सक्रिय सहकार्य केले. या उपक्रमामुळे ग्रामस्तरावर सकारात्मक बदलाची चाहूल लागली असून, शाळांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.फोसेको इंडिया लिमिटेडचा हा उपक्रम ग्रामीण भागात शिक्षणाचे बीज पेरणारा ठरणार असून, विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी एक सशक्त पायाभूत ठरणार आहे.

# गुरु हा दीपस्तंभासारखा असतो–ह.भ.प. हरिश्चंद्र नागपूरे महाराजांचे प्रतिपादन

**चिमूर । प्रतिनिधी**

गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भिसी येथील गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त आध्यात्मिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले. ब्रह्ममुहूर्तावर सामूहिक ध्यानाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन बापूराव बोमेवार, गरिबा मिमजे, मनोहर वानखेडे आदी मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

दुपारी ३ ते ५ या वेळेत गुरुदेव भजन मंडळ, भिसी यांच्या वतीने प्रार्थना मंदिरात गुरूस्तवनपर भक्तिगीत व भजन सादर करण्यात आले. गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नीलकंठ काटेखाये यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वसंत घानोडे यांनी केले. मार्गदर्शन सत्रात प्रा. डॉ. नत्थू गिरडे, माजी जिल्हा परिषद सदस्या ममता इकरे, प्रा. ममता पंधरे यांनी गुरु या संकल्पनेवर सखोल विचार मांडले. सायंकाळी अस्ताला सूर्य गेला, चल प्रार्थनेस आता या भावनेनुसार सामूहिक प्रार्थना घेण्यात आली. यावेळी प्रार्थनेचे महत्त्व विशद करताना ह.भ.प.



हरिश्चंद्र नागपूरे महाराज म्हणाले, समुद्रातील जहाजाला दिशा दाखवणारा दीपस्तंभ जसा मार्गदर्शक असतो, तसाच गुरु हा जीवनात दिशा देणारा दीपस्तंभ असतो. प्रार्थना हेच जीवनाचे सार आहे. नियमित ध्यान आणि प्रार्थना केल्यास जीवनात आमूलाग्र परिवर्तन शक्य आहे, असे त्यांनी भावनिक शब्दांत सांगितले.कार्यक्रमाचे संचालन गुरुदेव भक्त विजय घरत यांनी केले. मंच सजावटीसाठी राजू मुंगले, रतन शिवरकर आणि अब्देव मुंगले यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कृष्णा तेजने यांनी केले. या प्रसंगी ज्येष्ठ नागरिक संघाचे ईश्वर घरत, प्रदीप कामडी यांच्यासह गावातील अनेक नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बाबा रेवतकर, देविदास गभणे, माया घवघवे, रेवती भुजबळ, राजू दिघोरे, नाना भानारकर, बाळकृष्ण मुंगले, ठेंगणे, अशोक लान्टे, जांताराम नान्हे, सतीश काळबांधे इत्यादींनी विशेष सहकार्य केले.

# वायगांव नि येथे श्री बालाजी देवस्थान मध्ये गुरुपौर्णिमा साजरी



**वायगाव । प्रतिनिधी**

आषाढी एकादशी गुरुपौर्णिमे निमित्त श्री बालाजी देवस्थान मध्ये गुरू पोर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.सर्वप्रथम वं राष्ट्रसंत तुकडोजी महाराज वैराग्यमुर्ती गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे विधीवत पुजन दीपप्रज्वलन गुरुदेव प्रचारक बाबाराव देशमुख यांच्या हस्ते करुन सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. व ग्रामगिता अध्याय देवदर्शन वाचन करण्यात आले.गुरू विण नाही दुजा आधार.जिवनात यशस्वी होण्यासाठी गुरुचे किती महत्व आहे यावर अ.भा.गुरुदेवसेवा मंडळाचे वर्धा जिल्हा प्रचारक रमेश किनगांवकर यांनी प्रकाश टाकला तसेच गुरुचे म्हत्व आणि वं राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा प्रचार आणि प्रसार जास्तीत जास्त कसा होईल यासाठी गुरुदेव सेवकांनी एकत्रित येऊन रचनात्मक कार्य करावे.असा संदेश गुरुदेवजेष्ठ प्रचारक कृष्णा डबुरकर यांनी दिला. कार्यक्रमाचे संचालन डॉ मनोहर शिंदे यांनी केले. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वीकरीता गुरूदेव सर्वश्री मोरेश्वर मानकर,वामन मते,गजानन वरघने,नरेंद्र प्रजापती,प्रशांत बा.देशमुख,दिनेश काळे,नितीन मसकर,दिलीप ठाकरे,गजानन उगेमुगे,पवन महाराज माहुरकर,विलासभाऊ शिंदे,योगेश पराते,अरविंद बावने,शालीक लाजुरकर,पाल,मोहन खरडे,चि.मानव प्रं देशमुख सचिन देशमुख,तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# उमरखेड शहरात गांजाची विक्री करणाऱ्या इसमावर कारवाई; २ किलो ४२८ ग्रॅम गांजा जप्त

## गोपनीय माहितीच्या आधारे डीबी पथकाची यशस्वी धाड

**उमरखेड । प्रतिनिधी**

उमरखेड शहरात गांजासारख्या अमलीपदार्थाची विक्री करणाऱ्या एका व्यक्तीवर पोलिसांनी कारवाई करत त्याच्याकडून सुमारे २ किलो ४२८ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या कारवाईची बाजारमूल्य सुमारे ४६ हजार रुपये एवढी असून, आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे.

दि. ९ जुलै रोजी पोलीस उपनिरीक्षक योगेश जाधव यांना गोपनीय माहिती मिळाली की, उमरखेड–महागाव रस्त्यावर राजस्थान ढाब्याजवळ एक संशयित इसम गांजासह फिरत आहे. माहितीच्या आधारे उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली



उमरखेड पोलीस ठाण्याच्या डिटेक्शन शाखेने कारवाई केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गजानन अशोक डहाळे (वय २५, रा. गोचरस्वामी वॉर्ड, सोनार लाईन, उमरखेड) याला संशयाच्या आधारे थांबवून झडती घेतली असता त्याच्या जवळील पांढऱ्या रंगाच्या नायलॉन पोतडीत २ किलो ३१३ ग्रॅम गांजा आढळून आला. त्यानंतर त्याच्याकडून आणखी ११५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. एकूण २ किलो ४२८ ग्रॅम वजनाच्या गांजाची किंमत सुमारे ४६ हजार रुपये एवढी आहे.

या प्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात अंमलीपदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, आरोपीवर पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

ही कारवाई यवतमाळचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड, पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ, तसेच पोलीस उपनिरीक्षक योगेश जाधव, सागर इंगळे, पोहेकॉ संदीप ठाकूर, पोहेकॉ दिनेश चव्हाण, पोशि नोळे, पोशि महाळनर, पोशि दरवस्तेवार, व चालक पोकॉ रुद्र यांच्या संयुक्त प्रयत्नातून यशस्वीरीत्या पार पडली.अवैध अमलीपदार्थांच्या विरोधात पोलिसांकडून सुरू असलेल्या कारवाईने उमरखेड परिसरात चांगला संदेश गेला असून, पुढील काळातही अशा कारवाया अधिक गतीने होतील, अशी माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# सेवाभावी संस्थेचा रुग्णांसाठी पुढाकार; पिशोर रुग्णालयात स्वयंसेवक करणार थेट मदतकार्य

## मोहम्मद हुसैन बहुद्देशीय सेवाभावी संस्थेचे निवेदन सादर रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा या भावनेतून उपक्रम

**पिशोर । जावेद शेख**

पिशोर येथील मोहम्मद हुसैन बहुद्देशीय सेवाभावी संस्थेने समाजासाठी सेवा हेच आमचे ध्येय या तत्त्वज्ञानाने प्रेरित होऊन ग्रामीण रुग्णालयात थेट रुग्णसेवा देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. संस्थेच्या वतीने प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. धीरज पाटील यांच्याकडे निवेदन सादर करून, गरजू, वृद्ध व अशक्त रुग्णांसाठी स्वयंसेवकांच्या माध्यमातून रुग्णालयात थेट मदतकार्य करण्याची विनंती करण्यात आली आहे.

या उपक्रमांतर्गत स्वयंसेवक रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना आवश्यक माहिती देणे, उपचार प्रक्रियेत सहाय्य करणे, औषधे मिळविण्यास मदत करणे तसेच योग्य विभागात पोहोचवणे अशी विविध सेवा देतील. संस्थेचे अध्यक्ष शेख सलाउद्दीन यांनी सांगितले की, रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा मानून आम्ही हा उपक्रम हाती घेतला आहे. संस्था केवळ कार्यक्रमापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून समाजोपयोगी काम करणार आहे.मोहम्मद हुसैन बहुद्देशीय संस्थेने यापूर्वीही अनेक



आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, आरोग्य जनजागृती उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत. ग्रामीण भागात आरोग्यसेवा अधिक प्रभावी करण्यासाठी स्वयंसेवकांची भूमिका महत्त्वाची ठरेल, असा विश्वास संस्थेने व्यक्त केला आहे.या उपक्रमाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. धीरज पाटील यांनी स्वागत केले. सामाजिक संस्था आणि आरोग्य यंत्रणा यांच्यातील समन्वय ग्रामीण आरोग्य व्यवस्थेसाठी उपयुक्त ठरेल. आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणाले.

निवेदन सादरप्रसंगी माजी सरपंच पी. एम. डाहके, शेख आवेज, शेख आमेर, सय्यद मोबीन, शेख बिलाल, भाई खालिद, शेख जाफर यांच्यासह ग्रामपंचायत अधिकारी, सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी आणि अनेक स्थानिक नागरिक उपस्थित होते.ग्रामीण भागातील आरोग्य सेवा ही समाजाच्या हक्काची बाब असून, अशा सेवाभावी उपक्रमातून ती अधिक सक्षम होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. पिशोरसारख्या भागातून उचललेले हे पाऊल जिल्ह्याच्या इतर भागांनाही प्रेरणा देणारे ठरेल, असा सूर उपस्थित नागरिकांमध्ये उमटला.

# मकाई साखर कारखान्यातील थकीत पगारासाठी शिवसेना शेतकरी सेनेचा आक्रमक इशारा

## मुख्यमंत्री ‘वर्षा’ बंगल्यासमोर आमरण उपोषणाचा निर्धार कर्मचाऱ्यांचा सात वर्षांचा संघर्ष आता मुंबईच्या उंबरठ्यावर

**सोलापूर । प्रतिनिधी**

मकाई सहकारी साखर कारखान्यातील शेकडो कर्मचाऱ्यांना गेल्या सात वर्षांपासून थकीत वेतनाच्या समस्येला सामोरे जावे लागत असून, या अन्यायाविरोधात अखेर शिवसेना शेतकरी सेनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. शासनाने कारखान्याला ज्या १४० कोटी रुपयांची मदत दिली होती, त्यातील २० कोटी रुपये कर्मचाऱ्यांच्या थकीत पगारासाठी वापरण्याचे आदेश असतानाही संचालक मंडळाने ती रक्कम अन्य व्यवहारांवर खर्च केली आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप असून, न्याय मिळेपर्यंत संघर्ष थांबणार नसल्याचे स्पष्ट करत शिवसेना शेतकरी सेनेचे अध्यक्ष संतोष वारगड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुंबईतील ‘वर्षा’ निवासस्थानी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.पगार, भविष्य निर्वाह निधी आणि कर्ज फेड यांसारख्या मुलभूत हक्कांसाठी कर्मचाऱ्यांनी गेल्या १५ दिवसांपासून कारखान्याच्या गेटसमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. मात्र, व्यवस्थापनाने याकडे कोणतेही गांभीर्याने लक्ष दिलेले नाही. कर्मचाऱ्यांचे सात वर्षांचे थकीत वेतन, प्रॉव्हिडंट फंड बँकेत जमा करणे आणि कर्मचाऱ्यांच्या नावावर असलेल्या बँक कर्जांची फेड हे सर्व विषय वारंवार मांडले गेले असूनही कोणतीही ठोस कृती करण्यात आलेली नाही.संतोष वारगड यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, आमच्या मागण्या आठ दिवसांत मान्य न झाल्यास, आम्ही ५०० कामगारांसह मुंबईत उपोषणाला बसू. शासनाने जर वेळेत निर्णय घेतला नाही, तर आंदोलन तीव्र करण्याशिवाय पर्याय उरणार नाही.या आंदोलनाला शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांचाही पाठिंबा असून, संपूर्ण यंत्रणेने कामगारांच्या मागे उभे राहण्याची घोषणा केली आहे.येत्या काळात ही लढाई अधिक तीव्र होण्याची शक्यता असून, तालुक्यातील जनतेतही या मुद्द्याबाबत तीव्र संताप पसरत आहे. तालुकाप्रमुख कैलास पाखरे, उपाध्यक्ष अभिजीत शिर्के, तसेच अल्पसंख्यांक सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष सिकंदर मुलानी यांनीही या लढ्याला पूर्ण पाठिंबा दर्शविला आहे. कर्मचाऱ्यांचे पगार आणि हक्क हा निव्वळ आर्थिक नाही, तर मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न आहे, आणि त्यासाठी लढा शेवटपर्यंत सुरू राहणार आहे, असे सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

> **शासनाने जर या गंभीर प्रश्नाकडे पुन्हा दुर्लक्ष केले, तर साखर आयुक्तालयालाही याचा परिणाम भोगावा लागेल, अशी सूचक टीप देत शेतकरी सेनेने सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. आता हा संघर्ष केवळ कारखान्यापुरता मर्यादित न राहता, मुंबईच्या उंबरठ्यावर पोहोचणार असून, सरकारपुढे निर्णायक भूमिका घेण्याची वेळ जवळ आली आहे.**
> **– संतोष वारगड,अध्यक्ष, शिवसेना शेतकरी सेना**

# रुग्णवाहिका चालकांचे तीन महिन्यांचे वेतन थकले; प्रशासनाच्या दिरंगाईने कर्मचाऱ्यांचे मानसिक आरोग्य ढासळले

**संघटनेच्या प्रमुख मागण्या**

१. मागील तीन महिन्यांचे थकित वेतन तात्काळ अदा करावे.
२. यापुढे दरमहा वेळेवर वेतन मिळण्याची हमी प्रशासनाने द्यावी.
३. १० वर्षांहून अधिक सेवा बजावलेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत समाविष्ट करून नियमित करावे.
४. अन्यथा संघटना उच्च न्यायालयात याचिका दाखल करेल.





**वर्धा । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील १०८ रुग्णवाहिकांवरील चालक गेल्या तीन महिन्यांपासून वेतनापासून वंचित असून, शासनाच्या आणि प्रशासकीय यंत्रणेच्या उदासीनतेमुळे हे कर्मचारी आर्थिक व मानसिक संकटात सापडले आहेत. वर्धा जिल्हा रुग्णवाहिका कर्मचारी संघटनेच्या वतीने जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे यासंदर्भात तात्काळ वेतन देण्याची मागणी करत लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे.या कर्मचाऱ्यांनी छठक्व् अंतर्गत मागील १० वर्षांपासून सेवाभावाने कार्य बजावले असून, २४ तास अपघातग्रस्त, आपत्कालीन रुग्णांच्या सेवेसाठी तत्पर राहिले आहेत. मात्र त्यांच्याच मूलभूत वेतनाचा प्रश्न वारंवार प्रलंबित राहत असल्यामुळे, त्यांच्यावरील आर्थिक ओझं प्रचंड वाढले आहे. घरखर्च, मुलांचे शिक्षण, कर्जाचे हप्ते या सगळ्यांवर परिणाम होऊन कर्मचाऱ्यांमध्ये नैराश्य पसरले आहे.या निवेदनाची प्रत पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, तसेच उडउ ई-गव्हर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड यांना पाठवण्यात आली आहे. १०८ वाहनचालकांची यादीही सोबत जोडण्यात आली असून, ही गंभीर बाब तातडीने मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली आहे.

**प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी**

अनेक वेळा निवेदने देऊनही अद्याप वेतन मिळालेले नाही. शासनाच्या व प्रशासकीय यंत्रणेच्या या दिरंगाईविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत, संघटनेने स्पष्टपणे १७ जुलै २०२५ पर्यंत वेतन न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

**आम्ही संकटातही सेवा केली, पण आमच्याच मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष**

कोरोना, पूर, अपघात, कोणतीही आपत्ती असो, आम्ही दिवस-रात्र रुग्णांच्या सेवेसाठी तत्पर होतो. मात्र, आज आम्हालाच आमच्या पोटापाण्यासाठी लढावे लागत आहे, हे दुर्दैव आहे, असे एक चालक भावुक होऊन म्हणाले.

# जूनियर नॅशनल रग्बी चॅम्पियनशिप स्पर्धेत साठी महाराष्ट्रा च्या टीम मध्ये धामणगावतील निधी निंभोरकर ची निवड

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

अमरावती जिल्ह्यातील धामणगाव येथील निधी निंभोरकर जूनियर नॅशनल रग्बी चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या टीममध्ये निवडण्यात आली आहे. ही स्पर्धा देहरादून, उत्तराखंड येथील गंगा अथलेटिक्स स्टेडियम, महाराणा प्रताप स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी येथे ८ ते १३ जुलै दरम्यान होणार आहे. या स्पर्धेत देशभरातील जोशपूर्ण खेळाडू येतील आणि राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित चॅम्पियनशिपसाठी आपली कौशल्ये प्रदर्शित करण्याची ही एक संधी आहे.निधी निंभोरकरची निवड ही महाराष्ट्राच्या रग्बी क्षेत्रातील एक महत्त्वाची प्रगती आहे. निधींनी रग्बी क्षेत्रातल्या आपल्या कौशल्यांचा पुरेपूर वापर करून स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करण्याचा प्रयत्न करेल. महाराष्ट्राच्या खेळाडूंना संधी देण्याच्या संस्थांच्या प्रयत्नांना ही निवड योग्य म्हणून मानली जात आहे.

**दिनांक ८ ते १३ जुलै: देहरादूनची जोरदार**




**तयारी**

देहरादूनच्या गंगा अथलेटिक्स स्टेडियमने जूनियर नॅशनल रग्बी चॅम्पियनशिपसाठी आपली तयारी पूर्ण केली आहे. ही स्पर्धा ८ ते १३ जुलै दरम्यान आयोजित केली जाणार आहे आणि यामध्ये भारतातील विविध राज्यांच्या टीम्सचा सहभाग असेल. या स्पर्धेतील विजेतेपदासाठी संघाने आपल्या सर्वोत्तम खेळाडूंची पूर्ण तयारी केली आहे.

**महाराष्ट्राच्या निधी निंभोरकर ची निवड: एक महत्त्वाचा टप्पा**

निधी निंभोरकरची निवड ही महाराष्ट्रातील खेळाडूंच्या प्रगतीसाठी एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. रग्बी हा खेळ कमी प्रसिद्ध असला तरी, निधींसारख्या खेळाडूंनी आपल्या कौशल्यांना वाव दिल्याने हा खेळ आता अधिक प्रगती करू शकतो. राज्यातील खेळाडूंना अधिक संधी मिळाव्यात आणि त्यांच्या कौशल्यांचा योग्य वापर व्हावा यासाठी अशा निवडी महत्त्वपूर्ण आहेत

# दहेगाव गोसावी रेल्वे बोगदा पाण्याखाली नागरिक त्रस्त,प्रशासनाचे लक्ष वेधण्याची मागणी

**वर्धा । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दहेगाव गोसावी येथील नागरिक सध्या मोठ्या अडचणीत सापडले असून, दहेगाव गोसावी-केळझर मार्गावरील नव्याने तयार झालेला रेल्वे बोगदा पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. सलग झालेल्या पावसामुळे या बोगद्यामध्ये पाणी साचले असून नागरिकांची, विशेषतः शेतकरी, विद्यार्थी आणि महिला वर्गाची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे.



पुढे विहीर मागे आड, जावं तरी कुठे? अशी अवस्था गावकऱ्यांची झाली असून, नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. साहेब, आता आम्ही प्रवास करायचा तरी कसा? असा सवाल नागरिक करत आहेत. गावातून जाणाऱ्या नागपूर-मुंबई, चेन्नई रेल्वे मार्गावरील तुळजापूर रेल्वे स्थानकाजवळील बोगदा नुकताच बांधण्यात आला असला तरी पाणी निचऱ्याची कोणतीही योग्य व्यवस्था करण्यात आलेली नाही. परिणामी, संपूर्ण बोगदा जलमय झाला असून अपघात होण्याचा संभाव्य धोका निर्माण झाला आहे.विकासाच्या नावाखाली लोकांना त्रास का सहन करावा लागतो? असा सवाल करत भाजप सोशल मिडिया प्रमुख संजय पिसुडडे, बूथप्रमुख सचिन महाबुधे, समाजसेवक मनोहर धंदरे, योगेश खाडे आणि किशोर गलांडे यांनी तात्काळ उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांच्या वतीने केली आहे.खासदार, आमदार आणि रेल्वे प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांतून केली जात आहे.

## पारसनाथ उपचार केंद्राचे वर्धा शहरात उदघाटन

# आयुर्वेद भारती संस्कृतीशी निगडीत वैद्यकशास्त्र-खास.अमर काळे

**वर्धा । प्रतिनिधी**

भारतीय जीवनशैलीचा आयुर्वेदाशी फार निकटचा संबंध प्रकर्षाने जाणवते. चार वर्षापुर्वी कोरोनाच्या महामारीमुळे संपूर्ण देशात युध्द्धसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. परिस्थिती हाताळणाच्या शासन यंत्रणेसोबत आघाडीवर असणारे डॉक्टर्स मंडळीला आज समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. कोरोना संकटावर मात करण्यासाठी तूर्तास तरी उपलब्ध औषधोपचार हा आयुर्वेदाशी निगडीत असल्याचे आढळून आले. तेव्हा वेदशास्त्राची परंपरा असणाऱ्या भारतीय संस्कृतीशी निगडीत या आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार होण्यास एक मोठे आधार ठरले आणि लोकांचा कल या आयुर्वेदिक उपचार पद्धति कडे वाढले आहे. असे प्रतिपादन वर्धा जिल्हयाचे खासदार अमर शरदराव काळे यांनी व्यक्त केले.

ते ७ जुलै रोजी डॉ. संकेत विजय नाखले यांच्या पारसनाथ आयुर्वेदिक केंद्राच्या



उद्घाटन प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी वर्धेचे पोलीस अधिक्षक अनुराग जैन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सतिश अंभोरे, पारसनाथचे संस्थापक डॉ. भालचंद्र महामुनी, डॉ. सोनिया महामुनी, डॉ. अरविंद वंजारी, डॉ. संकेत नाखले, डॉ. प्राची नाखले, ऑल इंडिया शास्त्री सोशल फारमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही, ज्येष्ठ समाजसेवी मोहनबाबु अग्रवाल, श्यामसुंदर राठी, निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे, प्रहार समाज जागृती संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन मोहन गुजरकर आदी मान्यवर प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. अनुराग जैन म्हणाले की, आपले जीवन एक संघर्ष असून जो संघर्षमय जीवन जगतो, तोच खऱ्या जीवनाचा आनंद घेऊ शकतो. योग्य उपचार, आहार व सकारात्मक जीवनशैली अंगीकारल्यास जीवन चांगल्याप्रकारे व्यतीत करता येते. यावेळी कार्यकारी अभियंता सतिश अंभोरे, ज्येष्ठ समाजसेवी मोहनबाबु अग्रवाल आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. भालचंद्र महामुनी संचालन नामदेव अखाडे, तर आभार इंजि. विजय नाखले यांनी व्यक्त केले. पारसनाथ केंद्रातर्फे आयोजित एकदिवसीय शिबिरांत मोठ्या संख्यानी लोकांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमला. डॉ विद्या राजु कळसाईत, शशांक चतारे, प्रा. खलील खतीब, राजेश शर्मा, अब्दुल गणी, प्रा. मुमताज खान एहसान राही, राजु लभाणे, प्रशांत पांडे, मंगेश भोंगाडे, डॉ. राठोड, डॉ. घोडखांडे, डॉ. शोएब शेख, डॉ. सातपुते, डॉ. झोरे, डॉ. नितीन मेशकर, डॉ. वाडीभसमे, डॉ. जाधव, डॉ. देवतळे, डॉ. शिंदे, अनिल गावंडे, साहेबराव गोडे, संतोष देशमुख, हुमेरा राही आदी अनेक मान्यवर मंडळी आवर्जुन उपस्थित होते.

## हिंगणघाट येथे गुरुपौर्णिमा निमित्त वृक्षारोपण

# पर्यावरण संवर्धन आणि विकासाचा घेतला ध्यास



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

गुरु म्हणजे ज्ञान, दिशा आणि समर्पणाचे प्रतीक.थेंबांनी भरलेले ढग, फळांनी लगडलेले वृक्ष, खळखळून वाहणारी नदी - ही निसर्गातील गुरुत्वाची उदाहरणेच! तसेच, प्राथमिक शिक्षणापासून ते आत्मोन्नतीपर्यंत मार्गदर्शन करणारे शैक्षणिक व आध्यात्मिक गुरू हेही जीवनाला आकार देणारे आधारस्तंभ आहेत.

अशा गुरुपौर्णिमेच्या पावन दिनानिमित्त पर्यावरण संवर्धन व विकास समितीच्या वतीने हिंगणघाट येथील यशवंत नगर हनुमान मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. जिल्हाध्यक्ष विनोद सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. या वेळी त्यांनी पर्यावरण रक्षण, संवर्धन आणि हरित विकासाबाबत समाजात जागरूकता निर्माण होण्याची गरज असल्याचे सांगितले.या कार्यक्रमात जिल्हाउपाध्यक्षा नमिता पाठक, अध्यक्षा श्रेया चाफले, सचिव पल्लवी वडस्कर, वैशाली काटकर, संगीता कुडमेथे, राजू सावरकर, अर्चना उरकांदे, रुपाली देशमुख, प्रतिभा चरडे, साधना मॅडमवार, उज्वला चांभारे, अंबाडकर, शितल चंदनखेडे, शिल्पा रोढे, वैशाली वतारी, सारिका माशलकर, मानकर, निखाडे, कु. हेमा पुराणे, कु. वतारी, आणि इतर अनेक पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीपणे पार पडल्याबद्दल उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानण्यात आले.

# स्व.हरीश टावरी यांच्या जन्मस्मृती निमित्त १०० झाडांचे वृक्षारोपण

## वृक्षसेवा समिती व मित्रपरिवाराचा उल्लेखनीय उपक्रम

**सिंधी (मेघे) । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते स्व. हरीश टावरी यांच्या जन्मस्मृतीनिमित्त, वृक्षसेवा समिती व मित्रपरिवाराच्या वतीने सिंधी मेघे स्मशानभूमी लगत टेकडीवर १०० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात कडुलिंब, वड, पिंपळ, पारिजातक, टेकोमा, करंजी, आवळा, सागवान अशा विविध प्रजातींच्या झाडांचा समावेश होता.स्व. हरीशजी टावरी यांनी वर्धा जिल्ह्यात सामाजिक क्षेत्रात दिलेले योगदान अमूल्य होते. त्यांच्या सेवाभावी स्वभावाची आठवण जपण्यासाठी वृक्षसेवा समितीचे सदस्य विक्रम टावरी यांनी वृक्षारोपण हेच योग्य माध्यम असल्याचे नमूद केले.

याप्रसंगी समिती सदस्य किशोर बाहे व प्रदीप मेंढे यांनी टेकडीवरील वृक्ष लागवडीचे व संगोपनाचे महत्त्व उपस्थितांना समजावले.



२०१७ पासून सुरू असलेल्या वृक्षसंवर्धन उपक्रमातून, रद्दी संकलनाच्या माध्यमातून टेकडीवर बोरवेल खोदण्यात आल्यामुळे पाण्याची सुविधा निर्माण झाली असून यावर्षी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात येत आहे. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव रवींद्र नागपूरकर व किशोर बोकडे यांनी केले. या उपक्रमात विक्रम टावरी, श्रीमती हर्षा टावरी, डॉ. श्याम टावरी, डॉ. रवीश टावरी, डॉ. हासम शेख, कुडलिक बोरकर, विनीत टावरी, खुशबू टावरी, प्रकाश चांदेकर, अविका टावरी, शक्ती गिरीपुंजे, प्रभाकर राऊत, नीरज लोहकरे, संजय शर्मा, अण्णा पेंटे, दर्शन महाकालकर, दीपक चुटे, विनोद वानखेडे, ददनसिंग ठाकूर, मुकेश युरही, शैलेंद्र भुसारी, सुनील लंगडे, सुनील बेदरकर, महेश अडसुळे, सचिन खंडारे, सचिन धरणेदार, विलास कावळे, सुरेश पेठे, नारायण चरडे, विलास भवरे, अशोक भिवगडे, श्यामभाऊ परसोडकर, मंगेश भोंगाडे, राहुल गोल्हार, प्रदीप मेंढे, योगेश चौधरी, यश आकरे, श्रीकांत कहाते, हेमंत माध्यसवार, कृष्णा नांदुरकर या सर्वांनी सहभाग घेत स्व. हरीश टावरी यांना वृक्षारोपणाच्या माध्यमातून विनम्र अभिवादन केले.

# काजळी (ता.कारंजा घाडगे) गावाजवळील नाल्यावर पूल अद्याप अपूर्ण; शेतकरी शेतमजुरांची वाटचाल धोक्यात



**कारंजा घाडगे । प्रतिनिधी**

आर्वी विधानसभा मतदारसंघातील काजळी (ता. कारंजा घाडगे) गावाजवळील नाल्यावर मागील ३ वर्षांपासून पूलाची मागणी सुरु असूनही अद्याप त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. परिणामी, धामणगाव बंधन मार्गावरून येणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात हा रस्ता पूर्णतः धोकादायक ठरतो आहे.

स्थानिक नागरिक, शेतकरी आणि सामाजिक कार्यकर्ते रोशन वरठी यांनी याबाबत जिल्हाधिकारी, आमदार, खासदार यांच्याकडे वारंवार निवेदन सादर केल्याचे सांगितले. मात्र, अद्यापही या नाल्यावर पूल उभारण्याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.हे फक्त मतांसाठी आश्वासन होते का? की आता आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल?, असा रोष व्यक्त करत सामाजिक कार्यकर्ते रोशन वरठी यांनी लवकरात लवकर पूलाच्या कामास मंजुरी देऊन विकासकार्य सुरु करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला आहे.

**७५% शेतकरी व शेतमजूर प्रभावित**

काजळी गावालगत असलेला हा नाला शेतशिवाराकडे जाणारा प्रमुख मार्ग आहे. या नाल्यावर पूल नसल्यामुळे गावातील सुमारे ७५ टक्के शेतकरी व शेतमजूरांना शेती कामासाठी जाण्यासाठी मोठी अडचण भोगावी लागत आहे. विशेषतः शालेय विद्यार्थी, वृद्ध, महिला यांना हा मार्ग पार करणे कठीण झाले आहे.

**आता केव्हा होणार विकास?-जनतेचा सवाल**

निवडणूक झाली, आम्ही आमदार-खासदार निवडून दिले. तुम्हाला संविधानिक पदे दिली. पण आता तरी आमच्या या मूलभूत मागणीवर निर्णय कधी होणार? असा प्रश्न स्थानिक नागरिक विचारत आहेत.

# पूर्वी मंजूर विकास कामांचे उद्‌घाटन करण्यातच धन्यता संजयमामा शिंदे यांचा विद्यमान आमदारांवर हल्लाबोल

## केम–ढवळस रेल्वे भुयारी मार्ग भूमिपूजन सोहळ्यात टीका; दहिगाव योजनेच्या मुद्द्यावरूनही घेतला जाब

**सोलापूर । प्रतिनिधी**

२०१९ ते २०२४ या काळात मी मोठ्या प्रमाणावर विकास कामे मंजूर करून घेतली. मात्र, विद्यमान आमदारांनी अद्याप एकही नवीन काम मंजूर केलेले नाही. ते केवळ पूर्वी मंजूर झालेल्या कामांचे उद्घाटन करण्यातच धन्यता मानतात,अशी खरमरीत टीका माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी केली. केम–ढवळस प्रमुख जिल्हा मार्ग क्र. १४ वरील रेल्वे भुयारी मार्गाच्या भूमिपूजन सोहळ्यात ते बोलत होते.या मार्गावर रेल्वे क्रॉसिंग असून, केम गावाच्या पलिकडे असलेल्या ७ ते ८ लहान–मोठ्या गावांचा संपर्क थांबलेला होता. नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन तत्कालीन आमदार शिंदे यांनी प्रयत्न सुरू केले. राज्य शासनाच्या बजेटमधून निधी उपलब्ध करून देण्याची तयारीही त्यांनी दर्शवली होती. अखेर रेल्वे विभागाने स्वतःच्या अंदाजपत्रकातून निधी मंजूर केला आणि हा प्रश्न मार्गी लागला.भूमिपूजन प्रसंगी शिंदे म्हणाले, दहिगाव उपसा सिंचन योजनेचं काम बंद नलिका वितरण प्रणालीतून करावं, अशी मागणी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील सभागृहात करतात, तर त्यांचेच सहकारी आमदार नारायण पाटील मात्र यास विरोध करतात. हा विरोधाभास ग्रामस्थांनी विचारायलाच हवा.

शिंदे पुढे म्हणाले, वडशिवणे तलावात पाणी दिलं म्हणून डंका पिटला जातो, मात्र त्या तलावाला कायमस्वरूपी पाणी मिळावं यासाठी मी २०२४ मध्येच तत्कालीन जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिलं होतं. दहिगाव योजनेतून वाचणाऱ्या ०.४६ टीएमसी पाण्यातून वडशिवणे तलावासह इतर गावांनाही पाणी देता येऊ शकेल.विद्यमान आमदार



केवळ मलमपट्टीच्या धोरणात अडकले आहेत. मागेल त्याला पाणी देण्याचे धोरण त्यांनी उन्हाळी आवर्तनात राबवले, ज्याचा फटका वरकटणे, सरपडोह, सौंदे, साडे या कायम योजनेतील गावांना बसला. हे चुकीचं धोरण आहे, अशी जोरदार टीका त्यांनी केली.या कार्यक्रमाला उद्धव दादा माळी, संदीप तळेकर (प्रहार संघटना तालुकाध्यक्ष), अच्युत काका पाटील, विष्णू दादा पारखे, मारुती पारखे, उपसरपंच सागर कुरडे, ग्रामपंचायत सदस्य, गोरख काका पारखे, सुलतान मुलाणी, योगेश ओहोळ, विष्णू अवघडे, दत्तात्रय बीचितकर, विजयसिंह ओहोळ, सचिन काळे, उत्तरेश्वर सुरवसे, गणेश तळेकर, निंभोरेचे सरपंच रवींद्र वळेकर, अण्णासाहेब पवार, सूरज ढेरे, सागर राजे तळेकर (शिवसेना जिल्हा समन्वयक), अरुण लोंढे (चेअरमन), चंद्रकांत तळेकर, सचिन रणशिंगारे, संजय नवले, बालाजी अवताडे, धनंजय ताकमोगे, विकास कळसाईत, महादेव पाटमास, रिझवान झारेकरी, नागेश सुरवसे, बाजीराव तळेकर, दीपक तळेकर, बळीराम तळेकर, नवनाथ सुरवसे, संतोष कुर्डे, सुरेश देवकर, हरिभाऊ तळेकर, संजय आप्पा तळेकर, बापू तळेकर, अशोक तळेकर, पिनू तळेकर, अण्णासाहेब तळेकर, तानाजी तळेकर, कांतिलाल पवार, ईश्वर मस्के, दत्ता वळेकर, नाथ शिंदे, बाळू सुरवसे, राजेंद्र देवकर आदींसह जनई वस्ती, बीचितकर वस्ती, बाराबाई वस्ती आणि केम–ढवळस पंचक्रोशीतील नागरिक, शेतकरी, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवभारत कन्या विद्यालयात १७३ विद्यार्थिनींना एस. टी. मोफत प्रवास पास वाटप एक स्तुत्य उपक्रम

**मूल (प्रतिनिधी)**

राज्य परिवहन विभाग, चंद्रपूर आगाराच्या वतीने नवभारत कन्या विद्यालय, मूल येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मोफत प्रवास योजनेअंतर्गत थेट शाळेत येऊन १७३ विद्यार्थिनींना मोफत प्रवास पास वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना चंद्रपूरपर्यंत प्रवास करून पास काढण्याची गैरसोय टळली असून, त्यांच्या शैक्षणिक वाटचालीसाठी ही योजना मोठा आधार ठरणार आहे.

या उपक्रमासाठी विभाग नियंत्रक स्मिता सुतवने, मुख्याध्यापिका अल्का वरगंटीवार, चंद्रपूर बसस्थानक प्रमुख हेमंत गोवर्धन, सहाय्यक वाहतूक निरीक्षक नागापुरे, तसेच सतीश लुथडे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी सुतवने यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना सांगितले, एस.टी. सेवा ही ग्रामीण आणि शालेय विद्यार्थिनींसाठी केवळ



प्रवासाचे साधन नसून त्यांच्या शिक्षणातील सातत्य आणि आत्मनिर्भरतेचा खरा आधार आहे. नियमितपणे एस.टी. सेवा वापरा आणि शिक्षण प्रवास सुलभ करा,असे आवाहन त्यांनी केले. मुख्याध्यापिका वरगंटीवार यांनी परिवहन विभागाच्या या उपक्रमाचे मन:पूर्वक आभार मानून सांगितले की, विद्यार्थिनींना थेट शाळेत प्रवास पास मिळाल्यामुळे त्यांचा आर्थिक आणि मानसिक ताण कमी होईल. ही सुविधा खरोखरच प्रेरणादायी आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विजय सिद्धावार यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षिका अर्चना बेलसरे यांनी केले. विद्यार्थिनी, शिक्षकवृंद आणि पालकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत शासनाच्या योजनांमुळे शिक्षणाला चालना मिळत असल्याचे समाधान व्यक्त केले. हा उपक्रम केवळ पास वाटपापुरता मर्यादित न राहता, शासकीय यंत्रणांचा थेट संवाद, शाळेवर सेवा पोहोचवण्याचा प्रयत्न आणि विद्यार्थिनींच्या सशक्तीकरणाचा आदर्श ठरला, असे स्पष्टपणे दिसून आले.

# दुर्गादेवी विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**पारनेर (प्रतिनिधी)**

ढवळपुरी (ता. पारनेर) येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित श्री दुर्गादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमेचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पूजन होऊन कार्यक्रमाला प्रारंभ झाला. याप्रसंगी डॉ. भाऊसाहेब भोंडवे, मोहिनी भोंडवे, पंचायत समिती सदस्या ताराबाई चौधरी, ग्रामपंचायत सदस्य मच्छिंद्र व्यवहारे, राजू पथवे, प्रेमराज राठोड, गफूर शेख, भास्कर बिडे, मच्छिंद्र कुटे, रोहिदास घोगरे, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. भोंडवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आई–वडील आणि शिक्षक हे जीवनातील पहिले गुरू असतात. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच जीवनाला योग्य दिशा मिळते. त्यांचा सन्मान राखणे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे कर्तव्य आहे. त्यांनी गुरुपरंपरेचे महत्त्व सांगत संस्कारांच्या



जडणघडणीत गुरूचे स्थान अधोरेखित केले. ताराबाई चौधरी यांनी आपल्या मनोगतात, गुरुपौर्णिमा हा गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असून, विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनाचा आदर ठेवावा, असे मत व्यक्त केले. पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी गुरू हा मार्गदर्शक दीपस्तंभ असून, आपल्या संस्कृतीत त्यास देवत्वाचे स्थान आहे, असे सांगितले.

विद्यार्थ्यांनी गुरूंच्या महत्त्वावर भाषणे सादर केली. तसेच यावेळी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. त्यामध्ये संजय दळवी, संतोष व्यवहारे, सहादू भोंडवे, राहुल झावरे, अजित सांगळे, अमोल ठाणगे, सुभाष अडसुळ, राहुल नवले, भगवान राऊत, तुकाराम हराळ, अरविंद कुमावत, वर्षा शेळके, हर्षा जायभाये, जयश्री भोंडवे, गायत्री पवळ, निशा भोंडवे, सुरज थोरात, वसतीगृह अधीक्षक सुधाकर सुळे, शब्बीर शेख, राम चौरे, यमाजी झेंडे, फारुख शेख, चौधरी विश्वनाथ यांचा समावेश होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजित सांगळे यांनी केले, सूत्रसंचालन अमोल ठाणगे यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय दळवी यांनी मानले.

# छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याच्या कामास गती द्या; उभाठाची नगर परिषदेला निवेदनाद्वारे मागणी

## काम थांबले, शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या; शिवसेनेचा इशारा

**पुलगाव । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा पुलगाव शहरात उभारण्यात यावा, या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तर्फे नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.पुलगाव, नाचणगाव, गुंजखेडा व परिसरातील शिवभक्त आणि नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून पुतळ्याच्या स्थापनेची मागणी करत आहेत. या मागणीला प्रतिसाद देत १९ फेब्रुवारी २०१८ रोजी नगर परिषद आवारात पुतळा उभारण्यासाठी भूमिपूजन देखील करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर तब्बल सात वर्षे उलटून गेली, तरी पुतळ्याचे काम सुरु झालेले नाही. एक वीटही रचली गेली नाही, हे शिवप्रेमींच्या भावनांशी थट्टा असल्याचे शिवसेनेने म्हटले आहे.

शिवसेना शहर प्रमुख संदीप नारायणराव कुचे यांनी निवेदनातून इशारा दिला आहे की, जर लवकरात लवकर पुतळ्याचे काम सुरु झाले नाही, तर शिवसेना स्टाईलने तीव्र आंदोलन करण्यात येईल आणि याची पूर्ण जबाबदारी पुलगाव नगर परिषद प्रशासनाची असेल.या निवेदनप्रसंगी मोठ्या संख्येने शिवसैनिक आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून प्रशासनाने वेळेवर निर्णय न घेतल्यास परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते, अशी प्रतिक्रिया काही शिवसैनिकांनी यावेळी दिली.

# सामाजिक बांधिलकीचा अनोखा ठसा; डोंगरद्‌यांत जाऊन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले ज्ञानाचे साधन

## डीवीपीएसएस वैतरणा स्टेशन कमिटी आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**जव्हार । जितेंद्र मोरघा**

शिक्षणाचा प्रकाश सर्वदूर पोहोचावा, या उद्देशाने डीवीपीएसएस वैतरणा स्टेशन कमिटी आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या विशेष सहकार्याने डहाणू तालुक्यातील अतिदुर्गम भागांतील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. जव्हार परिसरातील चोंडीपाडा, आयरे, विनवळ आणि गेटपाडा येथील शाळांमधील सुमारे ५०० विद्यार्थ्यांना वह्या, पाट्या, पेन–पेन्सिल सेट आणि खाऊ यांचे वाटप करण्यात आले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अनेक देणगीदारांनी सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून सहकार्य केले. खडतर



रस्त्यांवरून १० ते १२ किलोमीटरचा प्रवास करत स्वयंसेवकांनी ही साहित्यसामग्री विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली. केवळ साहित्यवाटप न करता, शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरण संवर्धनाचे बीज रोवले गेले. झाडे लावा, झाडे जगवा या संदेशासह प्रत्येक शाळेच्या आवारात दोन झाडांची लागवडही करण्यात आली.

या प्रेरणादायी उपक्रमात डहाणू वैतरणा प्रवासी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष नागदेव पवार, उपाध्यक्ष सतीश धर्मा गावड, साई पाटील (साई पोल्ट्री फर्म), डीवीपीएसएस वैतरणा स्टेशन कमिटीचे अध्यक्ष लक्ष्मण वैती, उपाध्यक्ष गिरीधर टोकरे, कसराळीचे माजी सरपंच संतोष भोईर, सामाजिक सुरक्षा विभागातील अधिकारी नवनीत पाटील, कॉन्ट्रॅक्ट इंजिनिअर निलेश दळवी, पत्रकार जितेंद्र मोरघा आणि जयेश मोरे यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.या शाळांतील शिक्षकवर्गानेही नियोजनबद्ध सहकार्य करत उपक्रम यशस्वी होण्यासाठी मोलाचे योगदान दिले. या सामूहिक प्रयत्नातून सामाजिक बांधिलकी जपत, शिक्षणाच्या दिशेने एक मजबूत पाऊल उचलण्यात आले असून हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी ठरणारा आहे.


## हरवलेला रुद्र अखेर सापडला; एक फोन आणि रुद्र घरी परतला!

# नवी दिल्लीतील शोधमोहीम यशस्वी; माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांची मोलाची मदत

**बदलापूर । प्रतिनिधी**

दिवसेंदिवस अपहरणाच्या आणि मुलांच्या बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच, बदलापूर शहरातल्या वेहळे गावातील एक धक्कादायक आणि चिंताजनक घटना सुखरूप समाप्तीला पोहोचली आहे. चार दिवसांपूर्वी बेपत्ता झालेला रुद्र निलेश भोईर हा बालक अखेर नवी दिल्लीतील सदर बाजार परिसरात पोलिसांच्या मदतीने सापडला. या यशस्वी शोधमोहीमेत माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांचे योगदान मोलाचे ठरले.

४ जुलै रोजी रुद्र माणकोली–डोंबिवली पुलाजवळ हरवला होता. पालकांनी तात्काळ पोलिसांत तक्रार दाखल करून शोध सुरू केला. मात्र तीन दिवस उलटून गेले तरी त्याचा ठावठिकाणा लागत



नव्हता. ७ जुलै रोजी सकाळी साडे अकराच्या सुमारास रुद्रच्या व्हॉट्सॲप लोकेशनवरून त्याचे ठिकाण दिल्लीतील सदर बाजार भागात असल्याचे निदर्शनास आले. ही माहिती मिळताच त्याच्या नातेवाईकांनी तातडीने संपर्क साधून माजी मंत्री कपिल पाटील यांना कळवले.कपिल पाटील यांनी आपल्या दिल्ली कार्यालयातील कर्मचाऱ्यांमार्फत रुद्रचा फोटो आणि लोकेशन स्थानिक पोलिसांना पाठवले. तत्काळ कारवाई करत दिल्ली पोलिसांनी सदर बाजारमधील एका दुकानातून रुद्रला शोधून घेतले व सुरक्षित रित्या ताब्यात घेतले. चार दिवसांच्या चिंतेनंतर भोईर कुटुंबीयांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले.

रुद्र भोईर आपल्या वडिलांसह कपिल पाटील यांची भेट घेण्यासाठी दिल्लीला पोहोचला. त्यांनी आपल्या भावना व्यक्त करत कपिल पाटील यांचे आभार मानले. यावेळी कपिल पाटील यांनी रुद्रला आशीर्वाद देत सतर्क राहण्याचा सल्ला दिला. मुलांचे अपहरण किंवा बेपत्ता होण्याच्या घटना भविष्यातही नाकारता येणार नाहीत, त्यामुळे पालकांनी व मुलांनी अत्यंत सावध राहावे. शाळकरी विद्यार्थ्यांनी अनोळखी व्यक्तींशी संवाद टाळावा, आणि कुणीही संशयास्पद वाटल्यास तात्काळ माहिती पालक किंवा पोलिसांना द्यावी, असा सल्ला त्यांनी यावेळी दिला.रुद्र सुरक्षित घरी परतल्याने संपूर्ण गावात समाधानाचे वातावरण असून, पालकांच्या काळजीवर समाधानाचा पडदा पडला आहे.

# धामणगाव रेल्वेमध्ये मोफत त्वचाविकार तपासणी व मार्गदर्शन शिबिर

**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

धामणगाव रेल्वे येथे माहेश्वरी नवयुवक मंडळ, आम्ही बालाजी फाउंडेशन, महाराष्ट्र आणि आयएडीव्हीएल अमरावती शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत त्वचाविकार तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.हे शिबिर रविवार, १३ जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत माहेश्वरी भवन, धामणगाव रेल्वे येथे पार पडणार आहे.

या शिबिरात मुरुम, पुरळ, खाज, ॲलर्जी, काळे डाग, त्वचेचा काळसरपणा, पांढरे डाग, सोरायसिस, फंगल इन्फेक्शन (बोडकी, खरूज इ.), केसगळती, टक्कल, डोक्यावरील कोंडा, खाज, नखांचे विकार, चेहऱ्यावरील व्रण इत्यादी त्वचासंबंधी आजारांची तपासणी व सल्ला देण्यात येणार आहे .

शिबिरात उपस्थित राहणाऱ्या रुग्णांना निशुल्क तज्ज्ञ डॉक्टरांकडून सल्ला व आवश्यकतेनुसार औषधोपचार दिले जाणार आहेत. काही रुग्णांना शिबिरातच मोफत औषधही पुरवले जाणार आहे. शिबिर सर्वांसाठी खुलं आहे, मात्र सहभागी होण्यासाठी पूर्वनोंदणी आवश्यक आहे. इच्छुक



नागरिकांनी ९४२३४२५५३३ या क्रमांकावर संपर्क साधून नाव नोंदवावे, असे आवाहन माहेश्वरी नवयुवक मंडळाचे अध्यक्ष गौरव कोठारी आणि आयोजकांनी केले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# करमाळ्यात बांधकाम कामगारांसाठी साहित्य वाटप केंद्र स्थापन करण्याची मागणी; दलाली आणि भ्रष्टाचाराविरोधात शिवसेनेचा इशारा

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील बांधकाम कामगारांना सोलापूर येथून साहित्य मिळवण्यासाठी करावी लागणारी आर्थिक, मानसिक आणि वेळेची गैरसोय पाहता, शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी करमाळ्यातच बांधकाम कामगारांसाठी स्वतंत्र साहित्य वाटप केंद्र स्थापन करण्याची मागणी बांधकाम आयुक्त सुरेश कुंभार यांच्याकडे केली आहे. या मागणीबरोबरच करमाळा बांधकाम कार्यालयातील गैरव्यवहार, दलाली, आणि भ्रष्टाचाराच्या अनेक गंभीर तक्रारीही त्यांनी मांडल्या आहेत.

सध्या बांधकाम साहित्य वाटप सोलापूर येथून होत असल्याने करमाळ्यातील कामगारांना सुमारे १३५ किलोमीटरचा प्रवास करून सोलापूर गाठावे लागते. या प्रवासात एका कामगाराला सुमारे दोन हजार रुपयांचा खर्च, एका दिवसाचा पगार आणि मौल्यवान वेळ वाया जातो. विशेष म्हणजे सोलापूर एसटी स्थानकापासून साहित्य वाटप केंद्र तब्बल सहा किलोमीटर अंतरावर असल्याने त्यातही वेगळा खर्च करावा लागतो. ही व्यवस्था कामगारांसाठी मोठ्या त्रासदायक ठरत असून, त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज चिवटे यांनी अधोरेखित केली.

यासोबतच करमाळा बांधकाम कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. शासनाने या कार्यालयासाठी पाच कर्मचाऱ्यांचे वेतन मंजूर केले असतानाही प्रत्यक्षात फक्त दोनच कर्मचारी कार्यरत असून उर्वरित तिघांचा पगार कथितपणे हडप केला जात आहे. तसेच फर्निचरसाठी मंजूर झालेले दोन लाख रुपये आणि कार्यालयीन भाड्याच्या स्वरूपात देण्यात येणारे मासिक पंधरा हजार रुपये कशा पद्धतीने वापरले गेले, याबाबतही शंका उपस्थित करण्यात आली आहे. त्यांनी या कार्यालयाला दलालांचा अड्डा संबोधत, तेथून खऱ्या कामगारांना दूर ठेवण्याचे षड्यंत्रच रचले जात असल्याचा आरोप लावला.

शिवसेनेने आणखी एक गंभीर बाब उचलून धरली असून, काही राजकीय पुढाऱ्यांनी आपल्या पत्नींची नावे खोट्या बांधकाम कामगार म्हणून नोंदवून शासनाच्या योजनांचा गैरफायदा घेतल्याचा आरोप केला आहे. मजूर संस्थांकडून दोन हजार रुपये घेत खोटे दाखले दिले जात आहेत. एवढ्यावरच न थांबता शिष्यवृत्ती योजनांच्या माध्यमातून पुढाऱ्यांच्या मुलांना लाखो रुपयांचा लाभ मिळवून देण्यात आल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. पात्र कामगारांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सुद्धा दलालांकडून नोंदणीसाठी दोन ते तीन हजार रुपये, भांड्यांसाठी अडीच हजार रुपये आणि शिष्यवृत्तीसाठी पंधरा हजार रुपये वसूल करण्यात येत असल्याचे चिवटे यांनी उघड केले. या सगळ्या पार्श्वभूमीवर त्यांनी शासनाकडे पारदर्शक प्रक्रिया राबवून खऱ्या कामगारांना थेट लाभ मिळावा, अशी जोरदार मागणी केली आहे.

करमाळ्यात १३५० महिला कामगारांची नोंदणी असूनही एकाही कामगाराला अद्याप कोणताही प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही. ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. जर लवकरच सुधारणा झाल्या नाहीत, तर या कार्यालयातील दलालांना उघडपणे काळं फासू,असा तीव्र इशारा देत चिवटे यांनी आंदोलन छेडण्याची तयारी स्पष्ट केली.या प्रकरणाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास शिवसेनेतर्फे तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा देत महेश चिवटे यांनी ही कामगारहिताची लढाई अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.



# नगर–मनमाड रस्त्याच्या कामासाठी खासदार नीलेश लंके यांचे बेमुदत उपोषण सुरू

## काम सुरू झाल्याशिवाय माघार नाही; रस्त्याच्या दुरवस्थेवरून प्रशासनावर घणाघात

**पारनेर । सुयश नरसाळे**

विळद बायपास ते सावळी विहीर दरम्यानच्या नगर–मनमाड महामार्गाच्या अत्यंत निकृष्ट स्थितीबाबत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत खासदार नीलेश लंके यांनी शुक्रवारी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले. रस्त्याचे काम तात्काळ सुरू करावे, या एकाच मागणीसाठी त्यांनी हे आंदोलन छेडले आहे.

खा. नीलेश लंके म्हणाले, गेल्या सहा वर्षांपासून नागरिक या रस्त्याच्या कामाची वाट पाहत आहेत. २०१८ पासून रखडलेल्या या प्रकल्पास दरवेळी नव्या तारखा व घोषणांचे गाजर दाखवले जात आहे; मात्र प्रत्यक्षात काम सुरू होत नाही. आता जनतेच्या संयमाचा अंत झाला आहे.लंके यांनी स्पष्ट केले की, या मार्गावर झालेल्या अपघातांमुळे गेल्या चार वर्षांत ३८८ जणांचा मृत्यू घटनास्थळीच झाला आहे. रूग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू पावलेल्यांची संख्या धरल्यास हा आकडा हजाराच्या घरात पोहोचतो. त्यामुळे या रस्त्याचे काम तात्काळ सुरू होणे अत्यावश्यक आहे.जिल्ह्यातील चार आमदार व दोन खासदारांच्या मतदारसंघातून हा रस्ता जात असतानाही काम पूर्ण होत नसल्याने हे सरकार व प्रशासनाचे अपयश स्पष्ट होते. असा घणाघात खा. लंके यांनी केला.या कामासाठी एप्रिल २०२५ मध्ये वर्क ऑर्डर जारी करण्यात आली होती, मात्र अवकाळी पावसाच्या नावाखाली काम पुढे ढकलले जात आहे, ही लोकांची थट्टा आहे,असा आरोप करत लंके म्हणाले की, रस्त्याच्या दुरुस्तीच्या नावाखाली थातुरमातुर काम सुरू असून मुख्य कामाची वाट अजूनही पाहावी लागत आहे.




राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी उपोषण सुरू होताच खा. नीलेश लंके यांची भेट घेतली. त्यांनी पावसाळा ओसरेपर्यंत दोन महिने वाट पाहू, त्यानंतर काम सुरू करू अशी भूमिका मांडली. मात्र खा. लंके यांनी रस्त्याच्या दुरवस्थेचा आणि नागरिकांच्या मृत्यूचा मुद्दा उपस्थित करत प्रत्यक्ष काम सुरू झाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही,अशी ठाम भूमिका घेतली. परिणामी ही चर्चा निष्फळ ठरली.

## एक पेड माँ के नाम अभियानास पुलगाव येथे प्रारंभ

# वृक्षसंवर्धनाचा संदेश देत भारतीय जनता पक्षातर्फे वृक्षारोपण




**पुलगाव । प्रतिनिधी**

एक पेड माँ के नाम या अभियानाला दि. ११ जुलै २०२५ रोजी पुलगाव शहरात औपचारिक सुरुवात करण्यात आली. भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित या अभियानाचा कालावधी ११ जुलै ते १५ ऑगस्ट २०२५ असा निश्चित करण्यात आला असून, पर्यावरण रक्षण आणि मातृसन्मान या दोन्ही संकल्पनांना एकत्रित जोडणारा हा उपक्रम ठरत आहे.शहरातील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी चौक तसेच सर्कस ग्राउंड परिसरात वृक्षारोपण करून या उपक्रमाचा शुभारंभ झाला. या वृक्षांची देखभाल व संवर्धनाची जबाबदारी गजानन कादी, शंकर भानारकर आणि विजय ढगे यांच्याकडे देण्यात आली आहे.या कार्यक्रमाला भाजपा शहराध्यक्ष प्रशांत इंगोले, अभियानाचे विधानसभा संयोजक नितीन बडगे, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष मंगेश झाडे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष मधुकर रेवतकर, तसेच सुधीर बांगरें, आशिष गांधी, रिचर्ड क्रॉस, मानसिंग झांझोटे, राजकुमार पणपालिया, राजेश गुप्ता, अरविंद भार्गव, आकाश दुबे, अनिल लेकुरवाळे, मनोज वाल्दे, प्रीतम अरोरा, विशाल धोपाडे, अली असगर सैफी, नीरज ब्राम्हणे, महेश गुप्ता, प्रफुल्ल रावेकर, सुमित धनाडे, विजय भांडे, नीरज तिवारी यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वर्षावासात धम्मपालनाचा संकल्प करूया अभय रामटेके यांचा उपासकांना संदेश

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**



धामणगाव तालुक्यातील पळसखेड येथील सिद्धार्थ बुद्ध विहारात 'वर्षावास' निमित्ताने आयोजित कार्यक्रमात धम्मप्रचारक अभय रामटेके यांनी बौद्ध अनुयायांना मार्गदर्शन करताना वर्षावासाचा खरा अर्थ, त्यामागील शिस्त आणि साधना यावर सखोल प्रकाश टाकला.वर्षा म्हणजे पाऊस आणि वास म्हणजे एका स्थानी निवास. आषाढ पौर्णिमा ते आश्विन पौर्णिमा या तीन महिन्यांच्या काळात भिक्खूंनी एका स्थानी स्थिर राहून ध्यान, स्वाध्याय आणि धम्मसेवा करावी, ही तथागत बुद्धांची प्रेरणा आहे. रामटेके यांनी सांगितले की, विनयपिटकातील 'वर्षोपनायिका स्कंध' प्रकरणात याचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

बुद्धांनी या काळात प्रवास न करता एकाच स्थळी राहण्याचे महत्त्व सांगितले, कारण पावसाळ्यात प्रवासामुळे अनेक जीवांचा हानी होण्याचा संभव असतो. भिक्खूंनी या काळात एकत्र येऊन ध्यान, चिंतन आणि धम्माध्यापन करावे, असे रामटेके यांनी स्पष्ट केले.वर्षावासाच्या दोन प्रमुख कालखंडांचा उल्लेख त्यांनी केला 'पुरीमिकावस्सुनायिका' म्हणजे आषाढ पौर्णिमेपासून तीन महिने, आणि काही कारणास्तव उशीर झाल्यास 'पच्चिमिका' म्हणजे भाद्रपद पौर्णिमेपासून तीन महिने. पूर्वी या काळात भिक्खूंना एक दिवसही विहार सोडता येत नसे; मात्र तथागतांनी नंतर सात दिवस बाहेर जाण्याची मुभा दिली, हे त्यांनी नमूद केले.या काळात उपासक–उपासिकांनी भोजनदान, चीवरदान, औषधदान आदी पुण्यकर्मे करावीत. भिक्खूंनी उपासकांना धम्म शिकवावा आणि उपासकांनी धम्म आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा. हीच खरी वर्षावासाची फलश्रुती असल्याचे त्यांनी सांगितले.रामटेके यांनी उपस्थितांना आवाहन केले की, आपण आपल्या जीवनातील अज्ञान, अहंकार आणि विकारांचा त्याग करून बुद्धाच्या तेजस्वी मार्गावर चालण्याचा संकल्प करूया. संघटना, समता आणि संयम यांवर आधारित जीवन हीच धम्माची शिकवण आहे.कार्यक्रमाच्या शेवटी त्यांनी वर्षावासाच्या शुभारंभाच्या मंगलकामना देत उपासक–उपासिकांनी आचरणशील जीवन जगण्याचा निर्धार करावा, असे सांगितले. पळसखेड परिसरातील उपासक–उपासिकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धा व भक्तीने वर्षावासाचा शुभारंभ केला.

# शेवाळी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी मंगलबाई भदाणे यांची बिनविरोध निवड

## गावच्या विकासासाठी एकमताने घेतलेला निर्णय; उत्साहात पार पडली निवड प्रक्रिया

**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील आदर्श गाव ठरलेल्या शेवाळी (ता. साक्री) येथे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी मंगलबाई प्रकाश भदाणे यांची एकमताने व बिनविरोध निवड करण्यात आली. माजी सरपंच सुरेखा दत्तात्रय साळुंखे यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर नव्या सरपंच निवडीसाठी विशेष ग्रामसभा घेण्यात आली. ग्रामस्थांनी एकमुखाने मंगलबाई भदाणे यांच्यावर विश्वास दाखवून त्यांना कारभार सोपवला.

ही निवड प्रक्रिया निवडणूक अधिकारी गजानन दगडू सोनवणे, ग्रामसेवक मनोहर सोनवणे आणि तलाठी प्रमोद पवार यांच्या उपस्थितीत शांततेत व पारदर्शकपणे पार पडली. सरपंच म्हणून निवड झाल्यानंतर मंगलबाई भदाणे यांचा गावकऱ्यांच्या वतीने उत्स्फूर्त सत्कार करण्यात आला.



या वेळी माजी पोलीस पाटील धनाजी साळुंखे, माजी सरपंच माधवराव (बंडू) नाद्रे, अशोक भदाणे, अनिल साळुंखे, चित्राबाई नाद्रे, पंकज भदाणे, बापू भदाणे, भालेराव साळुंखे, मोहन साळुंखे यांच्यासह अनेक मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते. नवनिर्वाचित सरपंचांचा श्रीफळ, पुष्पगुच्छ व फुलहार देऊन सत्कार करण्यात आला.

गावातील नवीन ग्रामपंचायत इमारतीसमोर ढोल–ताशांच्या गजरात, डीजेच्या तालावर आणि फटाक्यांच्या आतषबाजीत गावकऱ्यांनी उत्साहाने हा ऐतिहासिक क्षण साजरा केला. ग्रामविकासासाठी एकसंघपणे पुढे जाण्याचा निर्धार यावेळी ग्रामस्थांनी केला.

# शिरूर तालुक्यातील ग्रामपंचायत आरक्षणामुळे सत्ता समीकरणात उलथापालथ; नव्या नेतृत्वाला संधी

**शिरूर । रमेश बनसोडे**

ग्रामपंचायती हा ग्रामीण लोकशाहीचा पाया असून स्थानिक पातळीवरील विकास, प्रशासन आणि नेतृत्व या सर्व बाबी ग्रामपंचायतीद्वारेच आकार घेतात. या नेतृत्वाची जबाबदारी कोणाच्या खांद्यावर असावी, हे निश्चित करणाऱ्या आरक्षण प्रक्रियेला शिरूर तालुक्यात नुकतेच मूर्त स्वरूप मिळाले. तालुक्यातील ९६ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांसाठी आरक्षण जाहीर करण्यात आले असून त्यामध्ये अनेक राजकीय सत्तासमीकरणे कोलमडली असून नव्या चेहऱ्यांसाठी राजकीय संधी खुले झाल्या आहेत.ही आरक्षण प्रक्रिया शिरूर तहसील कार्यालयात तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यापूर्वीच ७ ग्रामपंचायतींसाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत आरक्षण निश्चित करण्यात आले होते, तर उर्वरित ८९ ग्रामपंचायतींसाठी ११ जुलै रोजी सोडत घेण्यात आली. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकतेने राबवली गेली असून विविध सामाजिक घटकांना प्रतिनिधित्व मिळावे, हा यामागील मुख्य हेतू होता.

या आरक्षणामुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये सत्ताधाऱ्यांचे राजकीय गणित पूर्णपणे बदलून गेले आहे. वडगाव रासाई हे माजी आमदार अशोक पवार यांचे गाव अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याने सत्तेत असलेल्या गटासाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत. तर्डोबाचीवाडी हे स्वर्गीय माजी आमदार बाबूराव पाचर्णे यांचे गाव सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित झाले असून नव्या महिला नेतृत्वाला उदयाची संधी मिळाली आहे. मुखई हे भाजप नेत्या जयश्री पलांडे यांचे गाव अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षित झाल्याने त्याठिकाणी राजकीय फटके बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



तसेच कारेगाव हे जनता दलाचे नेते नाथा शेवाळे यांचे गाव ओबीसीसाठी आरक्षित झाले असून या वर्गातील उमेदवारांसाठी नवीन राजकीय वाटा खुले झाल्या आहेत. आरक्षणाच्या या प्रक्रियेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, सर्वसाधारण महिला आणि खुला प्रवर्ग या सर्व घटकांना संधी मिळाली आहे. मुखई, वाढू बुद्रुक, जांबूत, निमगाव म्हाळुंगी या गावांमध्ये अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षण जाहीर झाले आहे, तर वडगाव रासाई आणि माळवाडी या गावांमध्ये अनुसूचित जमाती महिलांना आरक्षण दिले गेले आहे. चव्हाणवाडी, सादलगाव, वाडा पुनर्वसन आणि पिंपळे जगताप येथे ओबीसी महिलांना संधी उपलब्ध झाली आहे. टाकळी भीमा, शिक्रापूर, गणेगाव दुमाला आणि कोरेगाव भीमा येथे सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित झाले आहे, तर शिरूर ग्रामीण, टाकळी हाजी, रांजणगाव गणपती, सणसवाडी आणि मांडवगण फराटा या गावांमध्ये खुल्या प्रवर्गात आरक्षण मिळाले आहे.

महिलांना मोठ्या प्रमाणावर मिळालेल्या आरक्षणामुळे तालुक्यातील ग्रामीण महिला नेतृत्वाला मोठी संधी प्राप्त झाली आहे. विविध सामाजिक स्तरांतील महिलांना राजकारणात प्रवेश मिळाल्याने लोकशाही अधिक बळकट होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आरक्षणामुळे अनेक ठिकाणी सत्ताधारी गटांची साखळी तुटली असून, काही ठिकाणी माजी सरपंच किंवा त्यांच्या कुटुंबीयांना यंदा निवडणूक लढवता येणार नाही. त्यामुळे नव्या चेहऱ्यांना संधी उपलब्ध होणार असून स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलण्याची शक्यता आहे.आरक्षण जाहीर झाल्यानंतर नागरिकांच्या प्रतिक्रिया संमिश्र स्वरूपाच्या होत्या. ज्या गावांमध्ये आपल्या इच्छित प्रवर्गाला आरक्षण मिळाले, तिथे आनंदाचे वातावरण होते, तर जिथे अपेक्षा भंग झाल्या, तिथे नाराजीही दिसून आली. अनेक ठिकाणी राजकीय गटांनी पुढील रणनीती आखण्यास सुरुवात केली असून संभाव्य उमेदवारांची नावे चर्चेत आली आहेत. निवडणुकीपूर्वीच ग्रामपंचायतींच्या राजकारणात नवचैतन्य निर्माण झाले आहे.या आरक्षणामुळे केवळ सत्तासमीकरणातच नव्हे, तर सामाजिक समतेच्या दिशेनेही एक पाऊल पुढे टाकले गेले आहे. नव्या नेतृत्वाला मिळणारी संधी, महिलांचा वाढता सहभाग, आणि विविध घटकांचे प्रतिनिधित्व यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था अधिक कार्यक्षम आणि लोकाभिमुख होण्याची अपेक्षा बळावली आहे. आगामी निवडणुकांमध्ये हे बदल कोणत्या रूपात समोर येतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# साई भक्तीचा पावन संगम–गणू महाराज यांच्या पुढाकाराने साई चरणी दुग्धाभिषेक

## गुरुपौर्णिमेच्या दिवशी भक्तिभावाने संपन्न सोहळा; समाजकार्य आणि आध्यात्मिक सेवेचा आदर्श



**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील म्हसदी (ता. साक्री) येथे गुरुपौर्णिमेच्या पवित्र दिवशी साई भक्तीने भारलेला, शांत व पावन असा सोहळा ग्रामस्थांच्या साक्षीने संपन्न झाला. येथील साई मंदिरात ग्रामपुरोहित गणू महाराज यांच्या प्रेरणेतून व पुढाकाराने साई चरणी भक्तिभावाने दुग्धाभिषेक करण्यात आला. श्रद्धा, भक्ती आणि सेवाभाव यांचा संगम साधणारा हा भक्तिपूर्ण कार्यक्रम अत्यंत साधेपणाने आणि उत्साहात पार पडला.गणू महाराज हे फक्त अध्यात्मिक जीवनावर निष्ठा असलेले पुरोहित नसून, समाजातील गरजू, अडचणीत सापडलेल्यांना मदतीचा हात देणारे, संकटसमयी धावून जाणारे एक सेवाभावी व्यक्तिमत्त्व म्हणून परिसरात ओळखले जातात. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने त्यांनी भक्ती आणि समाजसेवेचा अनोखा संगम घडवून आणत साई चरणी दुग्धाभिषेक साधला, जो गावकऱ्यांसाठी एक आध्यात्मिक आणि प्रेरणादायी अनुभव ठरला.या पावन सोहळ्याला राजेंद्र देवरे, आबासाहेब देवरे, गोपाळ भामरे, मयूर कुलकर्णी, निलेश कुलकर्णी, ठाकूर, प्रकाश देवरे, रावसाहेब देवरे, अमोल देवरे, पुजारी मंगलाबाई गांगुर्डे, विजय अहिरे, अविनाश देवरे, युसुफ पिंजारी आदी साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.गावात गणू महाराजांचे सामाजिक योगदान, सेवा वृत्ती आणि अध्यात्मिक कार्य हा एक श्रद्धेचा दिपस्तंभ ठरला आहे. गुरुपौर्णिमेच्या दिवशी पार पडलेला दुग्धाभिषेक सोहळा हा त्यांच्या सेवाभावाची आणि भक्तिपूर्वक निष्ठेची जिवंत साक्ष होता.

# निमा विद्यार्थी मंच व राष्ट्रवादी काँग्रेसचा विजय आरोग्य विद्यापीठात ७ पैकी ३ जागा जिंकल्या





**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीत निमा विद्यार्थी मंच महाराष्ट्र राज्य व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संयुक्त विद्यमान युतीला मोठे यश मिळाले आहे. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत एकूण सात जागांपैकी तीन जागांवर या युतीने विजय संपादन केला आहे. या निवडणुकीत अधिसभेवर (सिनेट) डॉ. निखिल महाजन, विद्यार्थी परिषद उपाध्यक्षपदी डॉ. आदर्श नलावडे, तर विद्यार्थी परिषद संयुक्त सचिवपदी डॉ. भूषण औसरमले यांची निवड झाली. या तिन्ही विजयी उमेदवारांचा वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उपमुख्यमंत्री अजित पवार, व महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते वर्षा निवासस्थानी सत्कार करण्यात आला. या प्रसंगी वसमत विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंद्रकांत नवघरे पाटील, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे सभापती रंजन दादा ठाकरे, तसेच निमा विद्यार्थी मंच महाराष्ट्राचे पदाधिकारी उपस्थित होते. डॉ. सागर कारंडे (वेब समन्वयक), डॉ. संकेत झाडे (अध्यक्ष), डॉ. कृष्णा चालगे (सचिव) व डॉ. योगेश उदगीकर (खजिनदार) यांचे कार्य विशेषपणे उल्लेखले गेले.

या निवडणुकीत निमा केंद्रिय संघटना, निमा महाराष्ट्र शाखा, तसेच महाराष्ट्रातील वैद्यकीय शाखेतील विद्यार्थी मतदारांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले. निवडणूक यशस्वी होण्यासाठी निमा संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी, माजी अध्यक्ष टेंभुर्णीकर सर, केंद्रीय उपाध्यक्ष डॉ. शैलेश निकम, डॉ. गजानन पडघन, केंद्रीय खजिनदार डॉ. शांतिलाल शर्मा, तसेच महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. राजू ताटेवार, सचिव डॉ. प्रशांत देशमुख, खजिनदार डॉ. सोपान खर्चे, डॉ. श्रीराम रगड, डॉ. पवन सोनवणे, डॉ. विष्णू बावणे, डॉ. देवेंद्र बचाव, अमीर कोटनाळ (सोलापूर) व डॉ. सदाकांत राठोड (नाशिक) यांनी मार्गदर्शन केले. या विजयामुळे निमा विद्यार्थी मंच व राष्ट्रवादी काँग्रेसच्या सहकार्याचे यश पुन्हा अधोरेखित झाले असून, विजयी उमेदवारांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला आहे. निमा विद्यार्थी मंच महाराष्ट्र राज्याच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचे, सहकार्य करणाऱ्या शिक्षकांचे आणि पदाधिकाऱ्यांचे मन:पूर्वक आभार मानण्यात आले आहेत.

## ठाकरे बंधूंची आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत युती झाली तर;महाविकास आघाडी फुटणार?

### काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांचे सूचक विधान-'एक पक्ष कमी होईल'



**मुंबई । विराम पवार**

ठाकरे बंधू २० वर्षांनंतर एकत्र येत असतील, तर त्यांचे स्वागतच आहे. आगामी निवडणुका ते एकत्र लढवणार असतील, तर त्याचेही स्वागत आहे; मात्र त्यामुळे 'एक पक्ष कमी होईल', असे सूचक विधान महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केले आहे. त्यांच्या या विधानामुळे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येत असल्याची शक्यता अधिक बळकट झाली असून, त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये फूट पडण्याची शक्यता असल्याची चर्चा सुरू आहे.मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मराठीच्या मुद्यावर एकत्र येण्याची घोषणा केली आहे. विशेषतः मुंबई महानगरपालिकेसह आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी ते एकत्र येणार असल्याचा दावा केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर चव्हाण यांनी हे विधान केल्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.पत्रकारांशी बोलताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, राजकीयदृष्ट्या वेगळे झालेले दोन भाऊ पुन्हा एकत्र येत असतील, तर हे स्वागतार्ह आहे. आगामी निवडणुकीसाठी ते एकत्र लढण्याचा निर्णय घेत असतील, तरीही ही सकारात्मक बाब आहे. मात्र, त्यामुळे एक पक्ष कमी होईल.ते पुढे म्हणाले, जर हा निर्णय केवळ एका निवडणुकीपुरता असेल, तर त्यानंतर काय होईल, हे सांगता येत नाही. भविष्यात राज आणि उद्धव ठाकरे यांचे पक्ष विलीन होतील का? आणि तसे झाले तर नेतृत्व कोणाकडे राहील? यावर जनतेला उत्सुकता आहे.याशिवाय, त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, कुठल्याही प्रकारच्या हिंसाचाराला आमचा पाठिंबा नाही.महाराष्ट्राची विशिष्ट परंपरा आहे आणि ती भंग करणाऱ्या कोणत्याही गोष्टीला आम्ही समर्थन देणार नाही.पृथ्वीराज चव्हाण यांनी स्पष्टपणे सांगितले की, काँग्रेस पक्ष धर्मनिरपेक्षता आणि संविधानिक मूल्यांवर ठाम आहे. आमची आघाडी 'इंडिया' आघाडीत आहे. उद्धव ठाकरे व शरद पवार हे त्याचे घटक आहेत. मात्र, या आघाडीतील कोणत्याही पक्षाने काँग्रेसच्या विचारसरणीला विरोध करणाऱ्या पक्षांसोबत युती करण्याचा विचार केला, तर काँग्रेस त्यास सहमत होणार नाही.चव्हाण यांनी यावेळी स्पष्ट सांगितले की, काँग्रेस स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवण्यास तयार आहे. आम्ही यापूर्वीही अनेक वेळा स्वबळावर निवडणुका लढवलेल्या आहेत. मुंबई, पुणे आणि नागपूर महानगरपालिका निवडणुका काँग्रेस स्वतंत्रपणे लढवेल, असे जरी पक्षाने जाहीर केले, तरी मला त्यात आश्चर्य वाटणार नाही.दरम्यान, लोकसभा व विधानसभेसाठी शिवसेना (उद्धव गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि काँग्रेसने एकत्र निवडणुका लढवल्या. मात्र आता मनसेसोबतच्या संभाव्य युतीमुळे महाविकास आघाडीच्या एकजुटीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## लोकसंख्या नियंत्रणासाठी सुजाण नागरिकांचा संकल्प महत्त्वाचा

### देवळी येथे जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त भाषण स्पर्धा संपन्न


**देवळी । प्रतिनिधी**

लोकसंख्या वाढ – एक आव्हान या विषयावर जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त एस. एस. एन. जे. महाविद्यालयातील एनसीसी भवनात आयोजित भाषण स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनिता सोनारे होत्या. एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. जगदीश यावले, तसेच विद्यार्थी प्रतिनिधी लक्ष्मी कावळे व युवराज डफरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.भाषण स्पर्धेत साक्षी परिसे हिने प्रथम क्रमांक, मयुरी पेटकर हिने द्वितीय तर कल्याणी लिखार हिने तृतीय पुरस्कार पटकावला. याशिवाय निशा कांबळे, त्रिशा विरपाते, प्राप्ती मांढरे, गायत्री पदीले आणि शीतल अष्टकार यांना प्रोत्साहनपर पारितोषिके प्रदान करण्यात आली.कार्यक्रमाचे संचालन कुंदन कावळे यांनी केले, तर सलोनी अजमीरे हिने आभारप्रदर्शन केले.कार्यक्रमाची सांगता लोकसंख्या नियंत्रणासाठी युवकांची भूमिका महत्त्वाची आहे या संकल्पासह शपथ विधीने करण्यात आली.



## सेंट जॉन हायस्कूल येथे विद्यार्थी परिषद निवडणूक उत्साहात संपन्न




**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक यशबोध ज्ञान प्रबोधिनी संचालित सेंट जॉन हायस्कूल, पुलगाव येथे दि. ०७ जुलै २०२५ रोजी विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीचे आयोजन करण्यात आले. या निवडणुकीस विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत लोकशाही प्रक्रियेचे प्रत्यक्ष शिक्षण घेतले.

विद्यार्थी परिषद निवडणुकीची सुरुवात शाळेचे प्राचार्य संतोष यादव, उपप्राचार्या आरती कुरझडकर व उपप्राचार्य महेंद्र भोयर यांच्या उपस्थितीत झाली. निवडणुकीमध्ये हेड बॉय, हेड गर्ल, स्पोर्ट्स मिनिस्टर, डिसिप्लिन मिनिस्टर या पदांसाठी मतदान घेण्यात आले.या उपक्रमाचे उद्दिष्ट नेतृत्वगुण, शिस्त, एकता, नम्रता, समानता आणि चांगल्या विचारांचा प्रसार या मूल्यांचे विद्यार्थ्यांमध्ये बिंबवणे हे होते.शाळेच्या अध्यक्षा प्रीती बोरसे यांनी विद्यार्थी परिषदेला शुभेच्छा देत, विद्यार्थी हेच उद्याचे नागरिक आहेत. त्यांच्यात सकारात्मक विचार रुजवणे हीच शिक्षणाची खरी दिशा आहे, असे प्रतिपादन केले.प्राचार्य संतोष यादव यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, विद्यार्थी परिषद म्हणजे देशाचे भविष्य घडवणारी शाळा आहे. नेतृत्वगुणांचे बीज यातून पेरले जाते.या निवडणुकीच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत शाळेच्या लोकशाही मूल्यांची प्रतिष्ठा अधिकच वृद्धिंगत केली.

## दुचाकी चोरटा अमरावतीतून अटकेत

### ८० हजारांची दुचाकी जप्त

**वर्धा । प्रतिनिधी**

भद्रावती येथील गौरव उर्फ गोलू मोहन जाधव (वय ३०, रा. वॉर्ड क्रमांक ५, आंबेडकर शाळेजवळ) या दुचाकी चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अमरावती येथून अटक केली आहे. त्याच्याकडून सुमारे ८० हजार रुपये किमतीची चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे.ही दुचाकी अजिंक्य चौधरी (वय २४, रा. राधानगर, प्रतापनगर) यांची असून, एमएच ३२ ए डोड ११०१ या क्रमांकाची हिरो कंपनीची मोटरसायकल बसस्थानकासमोरील कुरिअर कार्यालयासमोरून चोरीला गेली होती. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती.




तपासाच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली की गौरव उर्फ गोलू जाधव हा सदर गुन्ह्यात सहभागी आहे. त्यानुसार पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.ही यशस्वी कारवाई पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, पोलिस उपनिरीक्षक राहुल इंटेकर, तसेच अंमलदार नरेंद्र पाराशर, चंद्रकांत बुरगे, भूषण निघोट, अमोल नगराळे, मंगेश चावरे, दीपक साठे व मिथून जिचकार यांनी केली.


# सुमठाना-घोनाड मार्गाची चाळण; पावसात वाहून जातंय शिक्षण,प्रशासनाकडे उड्डाण पुलाच्या बांधकामाची मागणी

### ढोरवासा, तेलवासा, पिंपरी कोची, घोनाड परिसरातील रस्त्यांची अतिशय दयनीय अवस्था

## भुयारी पुलात दरवर्षी साचणारं पाणी विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळतंय

**चंद्रपूर । राकेश शिंगरू**

जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यातील सुमठाना ते घोनाड दरम्यानचा मुख्य रस्ता सध्या खड्ड्यांनी पोखरलेला असून, ढोरवासा, तेलवासा, पिंपरी, कोची, मुरसा आणि घोनाड या गावांच्या नागरीकांसाठी ही चाळण झालेली वाट आता जिवघेणी बनली आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थ्यांना या मार्गाने रोज शाळेत ये-जा करताना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात या मार्गावरून चालणे किंवा प्रवास करणे म्हणजे सरळपणे अपघाताला निमंत्रण देण्यासारखेच आहे.या मार्गावर चिरादेवी ते ढोरवासा दरम्यान रेल्वे फाटकाखाली भुयारी पुलाचे बांधकाम करण्यात आले असले तरी ते अकार्यक्षम ठरले आहे. या पुलाखाली दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचते. परिणामी, शाळकरी मुलांच्या मनात भीती निर्माण झाली असून, काही ठिकाणी पालकांनी मुलांना शाळेत पाठवणे थांबवले आहे.




शिक्षणावर परिणाम होतो आहे, आणि मुलांचे भविष्य थांबलेल्या पाण्यात अडकून पडले आहे, असे चित्र या भागात दिसून येते.

या संपूर्ण परिस्थितीकडे शासन आणि प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून, स्थानिक पातळीवर संतापाचा सूर वाढताना दिसतो आहे. वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्राचे शिवसेना (शिंदे गट) समन्वयक तसेच ढोरवासा ग्रामपंचायतीचे उपसरपंच मुनेश्वर बापुराव बदखल यांनी याबाबत ठोस भूमिका घेतली असून, प्रशासनाकडे तात्काळ रस्त्यांचे मजबुतीकरण व भुयारी पुलाच्या जागी उड्डाण पुलाच्या बांधकामाची मागणी केली आहे. मुनेश्वर बदखल यांच्यासह श्रीधर आत्राम, शिवम आसुटकर आणि इतर स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या दिरंगाईवर नाराजी व्यक्त करत, या समस्येचे तातडीने निराकरण न झाल्यास जनआंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, या रस्त्यांवरून रुग्णवाहिका, दवाखान्याकडे जाणारे रुग्ण, महिला, वृद्ध आणि विद्यार्थी यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करून केवळ निवडणूकवेळी विकासाच्या गप्पा मारल्या जात असल्याची टीकाही या भागातून ऐकू येत आहे.प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन सुमठाना-घोनाड मार्गाचे योग्य डांबरीकरण करावे, तसेच पावसात जीव धोक्यात घालणाऱ्या भुयारी पुलाच्या जागी आधुनिक उड्डाण पूल उभारावा, हीच नागरिकांची स्पष्ट आणि ठाम मागणी आहे.

### विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या पुलाचे रूपांतर उड्डाण पुलात करा!

**सुमठाना-घोनाड मार्गावरील रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. पावसाळ्यात चिरादेवी-ढोरवासा दरम्यानच्या भुयारी पुलाखाली दरवर्षी साचणारे पाणी हे केवळ अडथळा नसून, शाळकरी मुलांच्या शिक्षणासाठी आणि सुरक्षिततेसाठी एक मोठा धोका बनले आहे. प्रशासनाने वेळेवर लक्ष न दिल्यास जनतेचा संताप अनावर होईल. या भुयारी पुलाचे रूपांतर त्वरित उड्डाण पुलात करण्यात यावे, आणि रस्त्यांचे मजबुतीकरण करून प्रवास सुकर करावा. ही नागरिकांची नव्हे तर मुलांच्या भविष्यासाठीची हाक आहे.**



**-मुनेश्वर बापुराव बदखल**
**उपसरपंच, ढोरवासा ग्रामपंचायत**